
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ

व्ही.पी.एम्.

# दिशा



वर्ष पंचविसावे/अंक ६/जून २०२४

## संपादकीय

### ग्रामीण मुलांसाठी उन्हाळी शिबिर

आपल्या देशात ग्रामीण आणि नागरी अशी तफावत अजूनही आहे. जी शैक्षणिक संधी नागरी भागातील मुलांना सहज मिळते त्यापासून ग्रामीण भागातील विद्यार्थी वंचित राहतात. ही तफावत दूर करण्याचा उद्देशाने हैद्राबाद येथील 'स्व-शोधन ट्रस्ट'ने एका उन्हाळी शिबिराचे आयोजन केले. ६ मे ते ६ जून या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरासाठी तेलंगण राज्यातील धर्मपुरी हे गाव निवडण्यात आले. या गावातील जिल्हा परिषदेच्या मुलींच्या शाळेत हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. धर्मपुरी आणि आजूबाजूच्या गावांतील ९वीला शिकणारे ३० विद्यार्थी या शिबिरासाठी निवडण्यात आले. महिनाभर चालणारे हे शिबिर पूर्णपणे विनामूल्य असून, ट्रस्टच्या वतीने सर्व सहभागी विद्यार्थ्यांना दुपारचे रुचकर आणि पोटभर जेवण दिले जात असे.

स्व-शोधन ट्रस्टची स्थापना श्री करुणाकर रेड्डी या अमेरिका स्थित व्यक्तीने केली आहे. ते व्यवसायाने डॉक्टर असून हृदयरोग तज्ज्ञ म्हणून त्यांनी अमेरिकेत चांगले नाव कमावले आहे. सुमारे ३५ वर्षे अमेरिकेत राहिल्यानंतर त्यांनी भारतात परतण्याचा निर्णय घेतला आणि इथल्या गरीब विद्यार्थ्यांसाठी काम करण्याचे ठरविले. काही समविचारी लोक त्यांच्याशी जोडले गेले आणि कामाला गती आली. खेड्यापाड्यांतील शाळांना एलसीडी प्रोजेक्टर, टीव्ही मॉनिटर, इंटरनेट सुविधा पुरवायला त्यांनी सुरुवात केली. यासाठी लागणारे साहित्य देणे आणि त्यांचा प्रभावीपणे वापर कसा करावा याचे प्रशिक्षण देणे अशी कामे ते करू लागले. या कामात त्यांना चांगलेच यश मिळाले.

उन्हाळ्याच्या सुट्टीत मुलांना मिळणाऱ्या फावल्या वेळेचा सदुपयोग करून घेण्याची कल्पना रेड्डी यांच्या मनात दोन वर्षांपूर्वी आली. त्यानुसार त्यांनी हनुमंतराव गर्ल्स हायस्कूल हैदराबाद येथे मे-जून २०२३ या कालावधीत ३० मुलींसाठी एक महिन्याचे शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात नृत्य, चित्रकला, गायन, योग शिक्षण अशा अनेक बाबींचा समावेश होता. त्याचबरोबर संगणकाचा वापर, वैज्ञानिक प्रयोग आणि भारतीय ज्ञानपरंपरेचे धडे यांचा देखील समावेश होता. या शिबिरात मार्गदर्शन करण्यासाठी मला पाचारण करण्यात आले होते. विज्ञान क्षेत्रात

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)


नावाजलेल्या महिलांची जीवन कहाणी सांगण्याचा प्रयत्न मी केला होता. मागील वर्षी मिळालेल्या यशामुळे आणखी मोठे धाडस करण्याची प्रेरणा स्व-शोधन ट्रस्टला मिळाली. त्याबरहुकूम त्यांनी हैद्राबाद शहरापासून दूर असलेल्या ग्रामीण भागांतील मुलांसाठी शिबिर भरविण्याचा निर्णय घेतला.

शिबिराची वेळ सकाळी ८.३० ते दुपारी १ अशी होती. मे महिन्याच्या ६ तारखेला धर्मपुरी गावातील जिल्हा परिषदेच्या मुलींच्या शाळेत शिबिराचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. हे शिबिर तंत्रज्ञानाचा उपयोग करून दूरस्थ पद्धतीने चालविण्यात आले. प्रत्यक्ष कार्यक्रम स्थळी ट्रस्टचे काही मोजकेच सभासद उपस्थित असत. शिबिरात मार्गदर्शन करण्यासाठी वेगवेगळ्या देशांतील तज्ज्ञांची निवड करण्यात आली होती. ते जिथे आहेत तिथूनच त्यांनी मार्गदर्शन केले. चर्चेचे माध्यम तेलगू होते. तज्ज्ञ व्यक्ती तेलुगू बोलू शकत असतील तर उत्तम. नाहीतर त्यांनी दुसऱ्या भाषेत मांडलेले विचार त्यांच्या भाषेत भाषांतरित केले जात असत. त्यामुळे भाषेची अडचण राहिली नाही. त्यामुळे सहभागी विद्यार्थी आपल्या शंका बिनधास्तपणे विचारू शकले.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणे हा या शिबिराचा उद्देश होता. त्यासाठी शिबिरात अनेक बाबींचा समावेश केला होता. यात आधीच्या शिबिराप्रमाणे नृत्य, चित्रकला, गायन, योग शिक्षण या बाबींचा समावेश तर होताच, त्याचबरोबर विज्ञान क्षेत्रात घडणाऱ्या घडामोडी आणि त्यापासून निर्माण होणाऱ्या व्यावसायिक संधी यांची माहिती देण्यासाठी विशेष सत्राचा समावेश केलेला होता. या शिबिराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे जगातील वेगवेगळ्या प्रसिद्ध स्थळांना अप्रत्यक्ष भेट देण्याची संधी. आपल्याच गावात राहून ही मुले मोठमोठ्या शहरांत असलेल्या वस्तू संग्रहालयाला भेट देऊ शकत होते. त्याचबरोबर वेगवेगळ्या शहरांत राहणाऱ्या त्यांच्याच वयाच्या मुला-मुलींशी संपर्क साधू शकत होते. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे हे आता सहज शक्य झाले आहे. त्याचाच उपयोग स्व-शोधन ट्रस्टने प्रभावीपणे करून घेतला होता.

६ जून २०२४ रोजी या उन्हाळी शिबिराचा शेवट झाला. त्यावेळी सहभागी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सगळ्यांनीच शिबिर उत्तम झाल्याचे सांगितले. 'शिबिरात त्यांना जन्मभराची शिदोरी मिळाली' असे मत अनेक सहभागी विद्यार्थ्यांनी मांडले. शिबिरात जे काही शिकायला मिळाले त्यांचे विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिक करून दाखविले. काही विद्यार्थ्यांनी योगासने करून दाखविली. काही विद्यार्थ्यांनी गाणे सादर केले. ज्यांना चित्रकलेत आवड आहे त्यांनी चित्रे काढून दाखविली. समारोपाच्या कार्यक्रमाला पालकांना देखील पाचारण करण्यात आले होते. आपल्या मुलांनी महिन्याभरात जे काही अवगत केले ते पाहून ते आनंदित झाले. अशा प्रकारची शिबिरे नियमितपणे व्हावीत अशी इच्छा अनेक पालकांनी व्यक्त केली. या सूचनेचा मान राखून वर्षभर अशी शिबिरे आयोजित करण्याची योजना 'यशोधन ट्रस्ट' आखत आहे. त्यांच्या प्रयत्नांना यश येईल याची खात्री वाटते. अशी शिबिरे भारताच्या विविध भागांत नियमितपणे आयोजित करण्याची गरज आहे हे आवर्जून सांगावेसे वाटते.

**– डॉ. सुधाकर आगरकर**



व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष पंचविसावे/अंक ६/जून २०२४

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २८ वे/अंक १२ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | दगडी कोळशाची खुली खाण | दिलीप नारायण वंडलकर | ३ |
| ३) | 'आता विसाव्याचे क्षण...' | शेफाली वैद्य | ६ |
| ४) | युरोपातील प्रबोधन चळवळ | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ९ |
| ५) | कवितेविषयी काही निरीक्षणे | डॉ. आनंद कुलकर्णी | १२ |
| ६) | बौद्ध दर्शन | नरेंद्र गोळे | १४ |
| ७) | स्वर्गीय माधव जोशी : कल्पक, प्रयोगशील प्रकाशक हरपला | मकरंद मुळे | २१ |
| ८) | संगीतायन (लेख ४) - गंगालहरी | डॉ. कीर्ती आगाशे | २३ |
| ९) | 'देरसू उझाला' या पुस्तकाच्या अनुवादाची कहाणी आणि चित्रपटाचे परीक्षण.. | जयंत कुलकर्णी | २६ |
| १०) | दिनविशेष - प्रेरणादायी तेवढाच मार्गदर्शकही ! | प्रा. व्यंकटेश गंभीर (निवृत्त वैज्ञानिक) | ३१ |
| ११) | परिसर वार्ता | संकलित | ३५ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा. Email : vpmt1935@gmail.com
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# दगडी कोळशाची खुली खाण

*औष्णिक विद्युत केंद्रांना विजेचे उत्पादन करण्यासाठी कच्चा माल म्हणून लागणाऱ्या दगडी कोळशाचे उत्पादन मुख्यत्वे खुल्या खाणीतून केले जाते. या खाणींबाबत थोडक्यात माहिती आणि कामगारांना खणण करताना कोणत्या दिव्यातून जावे लागते याचे वर्णन लेखकाने या लेखात केले आहे. – संपादक*

भारतात सध्यातरी ऊर्जेची गरज मुख्यतः कोळशावर आधारित औष्णिक विद्युत केंद्रातून तयार होणाऱ्या विजेतून भागवली जात आहे. सुरुवातीला दोन मे.वॉट वीज उत्पन्न करणारे संच असल्याने त्यांना उच्च प्रतीचा कोळसा लागायचा. त्याची पूर्तता भूमिगत खाणीतून केली जाई. हळूहळू ऊर्जेची मागणी वाढू लागली. भूमिगत खाणीतून निघणारा कोळसा अपूरा पडू लागला. त्यातच ऊर्जा निर्मिती संबंधात नवीन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे गुणवत्तेत कमी असणारा कोळसा उपयुक्त ठरू लागला. त्यामुळे कधीकाळी २८ टक्क्यांपेक्षा जास्त राखेचे प्रमाण असणारा आणि अन्ग्रेडेबल म्हणून हिणवला जाणारा कोळसा आता मानाच्या पंगतीत दाखल झाला. भारतात उपलब्ध असणारा कोळसा हा बहुतांश कमी गुणवत्तेचा आहे. हा कोळसा खुल्या खाणीतून बाहेर काढणे सोयीचे असल्याने, मागणी आणि उपयुक्ततेच्या दृष्टीकोनातून कोळशाचे खणण सध्या खुल्या खाणींतून मोठ्या प्रमाणात सुरू आहे. अशाप्रकारच्या खाणीतून सुमारे तीनशे फूट खोलीपर्यंतचा कोळसा उत्खनन करण्यात येऊन औष्णिक विद्युत केंद्रांची गरज भागवली जात आहे.



**खुल्या खाणींचे कांही महत्त्वाचे फायदे असे आहेत.**

१. कोळशाचे १०० टक्के उत्पादन (भूमिगत खाणीतून फक्त एक ते दीड टक्के उत्पादन सुरक्षेच्या कारणास्तव होऊ शकते).

२. कामगारांसाठी सततची शुद्ध हवा आणि नैसर्गिक प्रकाशाची उपलब्धता.

३. १०० टक्के सुरक्षा

खुल्या खाणीत माती, खडक बाजूला करून कोळशाच्या थरापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात येतो. सुरुवातीला वरची सुपीक जमीन सजीव सृष्टीच्या वाढीस उपयुक्त असल्याने ती वेगळ्या सुरक्षित स्थळी साठविली जाते. त्यानंतर आधी ठिसूळ व त्याखाली टणक वाळूच्या दगडांचा थर असतो. सर्वांत शेवटी 'कामठी सिरीज' हा पाणी धरून ठेवणारा पण प्रवाहित असणारा थर लागतो. हा थर लागला म्हणजे आपण कोळशाच्या थराजवळ पोहोचल्याचे चिन्ह असते. सुरुवातीला सात ते दहा फूट उंचीचा माती आणि कोळसा यांचे मिश्रण असणारा 'शेल बँड' लागतो. तो संपला की लागलीच कोळशाचा सुमारे साठ फूट जाडीचा

थर उत्खननास उपलब्ध होतो. कोळशाची जाडी वेगवेगळ्या ठिकाणी कमी-जास्त असू शकते. भारतात 'सिंगरौली कोलफिल्ड' येथे ही जाडी नऊशे फुटांपेक्षा जास्त आहे..

वरकरणी खुली खाण हा खणण्यासाठी सहजसोपा मार्ग वाटत असला तरी प्रत्यक्षात हे काम तेव्हढे सोपे नाही. अवजड वाहने आणि मशीनरी यांच्यामुळे कामगारांना प्रदूषणाचा मोठ्या प्रमाणात सामना करावा लागतो. रस्ते बांधणीच्यावेळी होणाऱ्या प्रदूषणाचे अनुभव सामान्य नागरिकांना परिचयाचे आहेतच. खाणींच्या परिसरात मुख्य रस्त्यांवर 'वॉटर स्प्रिंक्लर्स' लावले असले तरी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी ते असतीलच याची खात्री नसते. खणण ही सततची पुढे - पुढे जाणारी प्रक्रिया आहे. 'गम बूट' पायात असले तरी एक ते दीड फूट जाडीच्या धुळीतून मार्ग काढताना दमछाक होते. त्यातच एखादे वाहन बाजूने गेले की संपूर्ण धूळ अंगावर येते. अशी ही होळीची धुळवड कामगारांसाठी नित्याचीच बाब आहे. अशा धुळीने माखलेल्या शरीरासह त्यांना दिलेली कामे त्यांच्या पाळीत शिस्तीने पार पाडावी लागतात. थोडक्यात, प्रदूषणापासून सुटका नाही.

विदर्भातील हवामान भारी विषमतेचे आहे, पावसाळ्यात धो-धो पाऊस, हिवाळ्यात हाडे मोडून काढणारी थंडी, तर उन्हाळ्यात चामडी सोलून काढणारे ४७ सेल्सिअस तापमान अशी परिस्थिती असते. त्यातच कामाच्या ठिकाणी भूस्खलन केंव्हा होईल याचा नेम नाही. असे असले तरी आमचा भिडू डगमगत नाही. एकदा कामावर रुजू झाला, की तो आपला थकवा विसरतो आणि उत्साहाने पुढील कामास प्रारंभ करतो. ड्रिलवाले, बारुदवाले, ड्रॅगलाईन, शॉवेल ऑपरेटर्स आपापली कामे सुरक्षेचे नियम पाळत चोखपणे बजावत असतात.

कामठी सिरीज मधून एखाद्या धबधब्याप्रमाणे कोसळणारे पाणी एका डबक्यात साठवले जाऊन नंतर त्याचा उपसा करण्यात येतो. सद्ध्या नागपूर जवळच्या कोराडी आणि खापरखेडा या केंद्रांना हे पाणी त्यांच्या वापरासाठी घेणे सुरू केल्याने या पाण्याचा सदुपयोग होत आहे. हे पाणी वेस्टर्नकोलफिल्ड विनामोबदला पुरवित असून विद्युत केंद्रांना उपशासाठी लागणाऱ्या विजेचा खर्च फक्त सहन करावा लागतो. अशाप्रकारे ही स्थिती दोन्ही संस्थांसाठी उपयोगी ठरते आहे.

तसा खुल्या खाणीतील कामगार एका बाबतीत श्रीमंत म्हटला पाहिजे. ते म्हणजे कामाच्या ठिकाणी असलेला मनमोहक धबधबा! यासाठी त्याला जोग, दुग्धसागर किंवा जबलपूरच्या भेडाघाटला जाण्याची आवश्यकता नाही. कधीकधी सूर्याच्या किरणांमुळे सप्तरंगी इंद्रधनुष्य तयार होते, तेंव्हा तर सारेच आपापले श्रम विसरून त्याचा मनसोक्त आनंद लुटतात. कठीण कामाच्या ठिकाणी तेव्हढाच विरंगुळा..! मात्र, हा धबधबा फसवाही असू शकतो. पावसाळ्यात जमिनीत असणारे झरे जिवंत होतात, पाण्याचा ओघ वाढतो, धबधबा विक्राळ रूप धारण करतो आणि आपल्या सोबत तरल माती, रेती वाहवत आणतो. त्यामुळे वरचा मातीचा आणि खालचा कोळशाचा थर यात पोकळी तयार होऊन मातीचा थर तरल होऊन क्षणार्धात खाली कोसळतो. २०१० साली असाच प्रकार घडल्याने उमरेडच्या खाणीत करोडो किंमतीच्या मशीनरी ढिगाऱ्याखाली दबल्या गेल्या आणि कांही कामगारांना प्राणास मुकावे लागले होते. यावर एकच उपाय, तो म्हणजे सततची जागरूकता!

खुल्या खाणीत कालांतराने मोठमोठी विवरे तयार होऊन अवतीभवती दगडमातीचे ढिगारे उभे राहतात. ही विवरे नव्याने निघणाऱ्या दगडमातीने बुजविण्याचा प्रयत्न करीत असतानाच उघड्या-बोडक्या ढिगाऱ्यावर

सुरुवातीला वेगळी काढलेली सुपीक माती टाकण्यात येऊन या ठिकाणी विविध प्रकारची झाडे लावली जातात. यातून घनदाट वनराई तयार होऊन पर्यावरणाचा समतोल राखण्याचा प्रयत्न केला जातो. काही ठिकाणी तर उत्तम पिकनिक स्पॉट अस्तित्वात आलेले आहेत. उदा. उमरेड आणि कामठी येथील वने.

आपण सुरुवातीला बघितल्यानुसार भूमिगत खाणीत सुमारे ९८ टक्के कोळसा सुरक्षेच्या कारणासाठी तसाच जमीनीत सोडून द्यावा लागतो. मात्र, कोळशाची वाढती मागणी लक्षात घेऊन तो आता खुल्या खाणीच्या माध्यमातून काढण्यात येत आहे. खुल्या खाणींचे कोळशाव्यतिरिक्त आणखी दोन उप - उत्पादने महत्त्वाची ठरत आहेत. आपण बघितलेच आहे की, कामठी सिरीजचे पाणी वर माती, दगड, रेती आणि कोळशाच्या थरातून झिरपत खाली येते. त्यामुळे हे जल खऱ्या अर्थाने 'शुद्ध मिनरल वॉटर' असते. हे जल 'कोलनीर' म्हणून स्थानिक लोकांना पुरविले जाते. दुसरे महत्त्वाचे उप-उत्पादन आहे ते रेतीचे. उत्खनन करताना अधूनमधून शुद्ध रेतीचा थर डोकावतो. ही रेती वेगळ्या ठिकाणी साठवून त्याची विक्री रास्त भावाने सरकार वा नागरिकांना केली जाते.

सध्या कोळसा कामगारांना उच्च वेतन मिळत असले तरी त्यांचे अल्प आयुष्यमान हा चिंतेचा विषय आहे. सरासरी आयुर्मान ५३ वर्षे आहे. बहुतांश कामगारांना 'सिलीकोसीस' या असाध्य आजाराला सामोरे जावे लागते. यात त्याच्या फुप्फुसांची कार्यक्षमता कमी होऊन उघड्या डोळ्यांनी मरण बघावे लागते. त्यामुळे येणारा प्रत्येक दिवस तो आनंदाने जगण्याचा प्रयत्न करीत असतो. आठवड्यातील सुटीचा दिवस म्हणजे त्याच्यासाठी पर्वणीच असते. या दिवशी तो पायजमा, बंगाली शर्ट, कानाच्या वरच्या पाळीत अत्तराचा फाया, तर आतल्या पाळीत हेडफोन, ऋतूमानानुसार गळ्यात गमछा वा डोक्याला मुंडासे आणि दाढी-कटींग करून गुळगुळीत चेहरा अशा थाटात परिवारासह बाजारात जातो आणि खरेदी करता-करता बुढ्ढीके बाल, किसलेला रंगबिरंगी आईसगोला, लस्सी पोटात रिचवून घरी आनंदाने परत येतो. कधी विचारलेच तर याचे उत्तर, 'ज्यादा जी कर क्या करेंगे साहाब..! हम जैसे भी जी रहें है, उसीमें जिंदगी का लुफ्त उठाते हुये जी रहें है. हमारा काम देश के हितमें हो रहा है, यही हमारे लिये बहुत बडी बात है' असे शब्द कानांवर आदळतात! सामान्य माणसाचे हे तत्त्वज्ञान पुष्कळ काही सांगून जाते आणि स्वतःला अंतर्मुख व्हायला भाग पाडते.

**- दिलीप नारायण वंडलकर**
४, नरकेसरी सोसायटी, उज्ज्वलनगर,
नागपूर - ४४००२५
मो.नं.: ९८३४६३६६५५
इ-मेल- wandalkardilipgmail.com

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

# 'आता विसाव्याचे क्षण...'

*ज्येष्ठ कवी बा भ बोरकर यांच्या 'आता विसाव्याचे क्षण' या कवितेचे रसग्रहण प्रस्तुत लेखात केले आहे- संपादक*

बा. भ. बोरकर हे माझे अत्यंत आवडते कवी. त्यांचे माझे नाते गोव्याच्या तांबड्या मातीचे. त्यांनी वापरलेली रूपके, उपमा, त्यांच्या कवितांमधून मधूनच एखाद्या व्रात्य मुलासारखे वर्गाच्या खिडकीतून डोकावणारे अस्सल कोंकणी शब्द आणि त्यांच्या शब्दा-शब्दामागे दडलेला गोव्याचा समृद्ध भवताल हे सर्व माझ्या परिचयाचे, जिव्हाळ्याचे.

बाकीबाबांनी त्यांच्या उतारवयात लिहिलेली 'आता विसाव्याचे क्षण' ही कविता मी पहिल्यांदा वाचली तेव्हा मी कॉलेज मध्ये होते, त्यामुळे त्या वेळी माझ्या स्वतःच्या अनुभव विश्वात बसणारी ती कविता नव्हती. पण माझ्या घरात माझे आजोबा होते आणि त्यांचे तृप्त, घरातल्या आढी घातलेल्या मानकुराद आंब्यासारखे मंद दरवळत, हळूहळू पिकत जाणे मी फार जवळून अनुभवलेले होते, त्यामुळे अगदी त्या वयातही ती कविता मला समजू शकली. त्यानंतर मी ती कविता वयाच्या आणि अनुभवांच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर परत परत वाचली आणि प्रत्येक वेळेला मला जाणवली ती त्या कवितेतली तृप्ती आणि सर्व भोगून झाल्यावर आलेल्या वार्धक्याचा समंजस स्वीकार.

खरे तर ही कविता जेव्हा बोरकरांनी लिहिलेली होती तेव्हा ते फक्त ६६ वर्षांचे होते, म्हणजे आजच्या परिभाषेत खरेतर टकटकीत तरुणच! पण १९७६ मध्ये जेव्हा त्यांनी ही कविता लिहिली तेव्हा माणसे साठीतच पंख मिटून घ्यायला सुरवात करायची. ह्या कवितेला डॉ. सलील कुलकर्णी ह्यांनी चाल लावली २०१३ मध्ये आणि ह्या कवितेचे जेव्हा गाणे झाले तेव्हा त्याला स्वर लाभला साक्षात लता मंगेशकरांचा. लता दीदी तेव्हा ८४ वर्षांच्या होत्या, म्हणजे ज्या भावस्थितीत ही कविता लिहिताना बोरकर होते ती भावस्थिती हे गाणे गाताना लतादीदी स्वतः जगत होत्या! लतादीदींनी आरती प्रभू, ग्रेस, पाडगांवकर, कुसुमाग्रज आदी अनेक प्रसिद्ध आधुनिक मराठी कवींच्या कविता गायलेल्या आहेत; पण बोरकरांचे त्यांनी गायलेले हे माझ्या माहितीतले तरी एकमेव गाणे!

मुळात ही कविता म्हणजे तृप्त, समंजस वार्ध्यक्याच्या सुरकुतलेल्या तरीही मऊ प्रेमळ हातांतून सांडलेले तीर्थोदक आहे! कविता आहे अगदीच छोटी, त्याला सलील कुलकर्णी यांनी बांधलेली चाल अगदी संथ लयीतली आहे. हिमालयाच्या पहाडातून खळखळत, दगडांमधून उड्या मारत, क्वचित स्वतःचे रौद्र स्वरूप दाखवत येणारी गंगा जेव्हा बंगालमध्ये समुद्राला मिळण्यासाठी उत्सुक होते तेव्हा तिचे पात्र विस्तारलेले असते, लाटांचा अवखळपणा कमी होतो, प्रवाहाला एक ठेहराव येतो, अनुभवांची खोली वाढते, रुंदी वाढते पण आवाज कमी होतो. नदी शांतवते. स्वतःलाच, तिच्या पात्राला आता एक ठेहराव आलेला असतो. ह्या गाण्यातला लता दीदींचा स्वर तसा आहे, एक शांत ठेहराव असलेला. पूर्वीसारखा उंच, शार्प नव्हे; तर पोत किंचित जाडसर, आटवलेल्या दुधावरच्या मलईसारखा जाड, मुलायम आणि केशरी.

बोरकरांची कविता सुरू होते तीच आपल्या

सर्वांच्या परिचयाच्या असलेल्या एका शब्दचित्राने. आयुष्याच्या सायंकाळी एखाद्या देवळाच्या खांबाला टेकून किंवा घरासमोर उन्हात बसून थरथरत्या हाताने जपमाळ ओढणारी म्हातारी माणसे आपण सर्वांनीच बघितली आहेत. कधी त्यांच्या मुखावर अतीव तृप्तीचे भाव असतात तर कधी एक अनामिक आर्तता असते. पण ह्या कवितेतली भावना ही आपली कर्तव्ये पूर्ण झाल्यावर येणाऱ्या कृतकृत्यतेच्या शांत समाधानाची आहे. कवी म्हणतो की, 'आयुष्यभर धावपळ केल्यावर त्याच्या आयुष्यात आता आलेले विसाव्याचे क्षण हेच त्याचे सोन्याचे मणी आहेत आणि त्या क्षणांना सुखाने ओवीत तो आठवणींची जपमाळ ओढतो आहे.'

आता विसाव्याचे क्षण
माझे सोनीयाचे मणी
सुखे ओवीत ओवीत
त्याची ओढतो स्मरणी...

कवी आता गोव्यात त्याच्या जुन्या गावी, जुन्या घरी आहे, पण त्याची मुले-लेकरे घरट्यातून उडून गेलेली आहेत. त्यांची आठवण, नातवंडांची सय तर दर क्षणाला येतेच, पण कवी खंत करत बसत नाही, त्याला दिसतात त्याच्या चौसोपी घराच्या राजांगणात पावसाची एक सर पडून गेल्यावर दाणे टिपायला आलेली, किलबिलाट करणारी पाखरे. तो त्यांच्यातच स्वतःची नातवंडे शोधतो! इथे मराठी नातवंडे ह्या शब्दापेक्षा 'कोंकणी नातरे' हा शब्द बोरकरांनी वापरलेला आहे, तो यमकात तर बसतोच, पण त्या शब्दाला जोडलेला जो उबदार जिव्हाळा आहे तो नातवंडे ह्या शब्दात नाही.

काय सांगावे नवल
दूर रानीची पाखरे
ओल्या अंगणी नाचता,
होती माझीच नातरे.

वृद्धत्वात माणसे भावनिक होतात, जुन्या आठवांच्या सावलीत त्यांचे डोळे काही कारण नसताना अवचित भरून येतात, तसे कवीचेही होते. त्याच्या मनीच्या मानसरोवरातल्या आठवणींच्या तळात डुबकी घेणारे त्याचे 'पैलातले हंस' त्याचे डोळे ओले करतात. इथे बोरकरांनी मानसरोवराची उपमा फार चपखलपणे वापरली आहे. ब्रह्मदेवाच्या मनाचे मूर्त रूप म्हणजे मानसरोवर, त्यात विहार करणाऱ्या हंसाना नीरक्षीर न्याय करता येतो, म्हणजे त्या सरोवरातल्या पाण्यात पडलेला दुधाचा एकच थेंब त्यांना आपल्या चोचीने अलगद टिपून घेता येतो. आयुष्यात बरे-वाईट असे अनेक प्रसंग येतात, पण त्यांच्या आठवणीत रमताना फक्त चांगल्या, सुखद आठवणींचे दूध तेवढे टिपून ज्याला घेता आले त्याच्या आयुष्याची सायंकाळ सोन्याचीच होणार हेच जणू बोरकर इथे सूचित करत आहेत.

कधी होती डोळे ओले,
मन मानसाची तळी
माझे पैलांतले हंस
डोल घेती त्याच्या जळी

कवी रसिक आहे, रसलोलूप आहे. त्याचे तारुण्य त्याने मनस्वीपणे उपभोगलेले आहे आणि त्याबद्दल त्याला खंत नाही. त्यातले काही हिशेब कधी अपूर्ण राहिलेलेही असतील, पण आयुष्याच्या ह्या टप्प्यावर तेही अपुरे हिशेब आता बोचत नाहीत, उलट जुन्या पांगल्या प्रेयसींनी आता त्या खतावण्या बंद केलेल्या आहेत. त्या चुली विझवलेल्या आहेत. आता आहे तो एक समंजस स्वीकार, त्या प्रेयसी जणू त्यांना सांगत आहेत की, 'वासनेचा, शरीर प्रेमाचा मादक गंध टाकून पुढच्या जन्मी आपले नाते अजून जिव्हाळ्याचे, कळवळ्याचे, बाप-लेकीचे होऊ दे. पण तुमची साथ आम्ही सोडणार नाही.'

---

साधेपणात फार मोठे 'सौंदर्य' असते!

कधी पांगल्या प्रेयसी
जुन्या विझवून चुली
आश्वासती, येत्या जन्मी
होऊ तुमच्याच मुली.

पुढचे कडवे म्हणजे ह्या कवितेचे सार आहे. वार्धक्याचा हा समंजस स्वीकार, हे सुरेख पिकत जाणे आले कुठून? त्याचे उत्तर आहे 'संतांच्या शब्दांतून', लहानपणी ऐकलेली संतांची वचने आता परत एकवार त्यांच्या 'मूळ ओलावल्या स्वरांनी' मनात गुंजत आहेत. त्यांनी दिलेले हे धैर्य आहे, हा स्वीकार आहे. हे कडवे डॉ. सलील कुलकर्णींनी ह्या कवितेला चाल लावताना गाण्यात घेतलेले नाही, पण मला फार आवडणारे हे कडवे आहे.

कधी उघडून तिळा
जुनी संतांची उत्तरे
टाळ-चिपळ्यांत गाती
मूळ ओलावल्या स्वरे,

त्यानंतर येणारे शेवटचे कडवे म्हणजे आयुष्याच्या परिपूर्तीचा एहसास आहे. आठवणींचे मणी ओढता ओढता आता दूर गेलेले सगे-सोयरे, मुले-नातरे यांच्या आठवणींनी डोळ्यांत आसवे तर उभी राहणारच, पण ही आसवे दुःखाची नाहीत, तृप्तीची आहेत, ज्या जबाबदाऱ्या खांद्यावर होत्या त्या चांगल्या रीतीने पार पाडल्याच्या समाधानाची आहेत. म्हणून त्या दूरदेशी सुखाने नांदत असलेल्या मुला-लेकरांना आणि स्वतःलाही, कवी आश्वासन देतोय की, ते जिथे कुठे सुखाने नांदत असतील तिथे त्यांच्यासवे कवीही नांदतोय. कारण ती त्याचीच मुले-लेकरे आहेत, त्यांच्यामध्ये त्याचेही अस्तित्व विरघळलेले आहेच. उद्या कवीचे अस्तित्व ह्या पृथ्वीवरून संपले तरी त्याच्या मुला-नातवंडांच्या रूपाने, त्याच्या शब्दांच्या रूपाने तो जिवंत राहणार आहे. हे अमरत्व फार आश्वस्त करणारे आहे.

मणी ओढता ओढता
होती त्यांचीच आसवे
दूर असाल तिथे हो
नांदतो मी तुम्हांसवे.

ही कविता नुसती वाचताना सुद्धा शांतवते, लता बाईंच्या स्वरात ती ऐकताना तर लहानपणी झोपी जाताना कपाळावर अलगद थोपटणाऱ्या आजीच्या प्रेमळ, वृद्ध, मऊ हातांच्या स्पर्शाची आठवण करून देते. साधी, संथ लयीतली गोड चाल, लतादीदींचा शांत, तृप्त स्वर आणि बोरकरांचे दैवी शब्द असलेले हे गाणे कितीही वेळा ऐकले तरी प्रत्येक वेळेला त्याच शांतीची, तृप्तीची, कृतार्थतेची अनुभूती देते. वार्धक्य असे यावे, 'कडाक्याच्या थंडीत पाय पोटाशी धरून कुडकुडत झोपी गेलेलो असताना कुणीतरी नकळत अंगावर पांघरलेल्या मऊ दुलईसारखे. उबदार आणि शांत झोपवणारे.'

**– शेफाली वैद्य**
ज्येष्ठ लेखिका
पुणे

•••

दिशा नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

उद्याचं काम आज करा आणि आजचं काम आत्ताच करा.

# युरोपातील प्रबोधन चळवळ

*युरोपातील प्रबोधन चळवळीविषयी माहिती देणारा लेख – संपादक*

मध्ययुगात साधारणपणे तेराव्या ते चौदाव्या शतकात युरोपमध्ये प्रबोधनाची चळवळ सुरू झाली. ही चळवळ अनेक शतके धिम्या गतीने परंतु सातत्याने चालू होती. या चळवळीमुळेच युरोप खंडातील देश आधुनिक व प्रगतीवादी होऊ शकले असे म्हणणे वावगे ठरणार नाही. एवढेच नव्हे तर, प्रबोधन चळवळीमुळेच युरोपात आधुनिक शास्त्र व विज्ञानाची पायाभरणी झाली व अनेक वैज्ञानिक शोध लागू लागले, किंबहुना आजही लागत आहेत. युरोपने जुने अंधश्रद्धेवर आधारित, तसेच अती टोकाचे धार्मिक विचार सोडून दिले व आधुनिक, मानवतावादी व वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारला. हे सर्व बदल घडवून आणणाऱ्या प्रबोधनाच्या चळवळीची सुरुवात युरोपमधील इटली या देशात झाली व हळूहळू तिचा प्रसार युरोपातील इतर देशांमध्ये झाला.

प्रबोधनाच्या चळवळीची सुरुवात होण्यास अनेक कारणे कारणीभूत होती. परंतु सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे, इसवीसन १४५३ मध्ये तुर्कांनी कॉन्सटेंटिनोपल या शहराचा केलेला पाडाव हे होय. कॉन्सटेंटिनोपल हे शहर रोमनांच्या पूर्वेकडील साम्राज्याच्या राजधानीचे शहर होते. तसेच या शहरात प्राचीन ग्रीक संस्कृतीच्या पाऊलखुणा टिकून राहिलेल्या होत्या. जेव्हा तुर्कांनी कॉन्सटेंटिनोपल शहर काबीज केले तेव्हा येथील युरोपियन वंशाच्या लोकांनी पलायन केले. येथून पळून जात असताना त्यांनी प्राचीन ग्रीक संस्कृतीच्या काळापासून जी ग्रंथनिर्मिती होऊन ज्ञानाचा प्रसार होण्यास मदत झाली ते ग्रंथ आपणासोबत इटली सारख्या देशांमध्ये आणले. सदर ज्ञानाचा खजाना पाहून व वाचून युरोपातील व प्रामुख्याने इटलीतील जनता प्रभावित झाली. आपल्या पूर्वजांनी ज्ञानाचा मोठा ऐवज निर्माण केला होता याचा त्यांना रास्त अभिमान देखील वाटू लागला. एवढेच नव्हे तर, आपणही अशाप्रकारची ग्रंथ निर्मिती करावी अशी प्रेरणा त्यांना मिळाली. यातूनच इटली व युरोपातील इतर देशांमध्ये नव साहित्य निर्मितीची चळवळ सुरू झाली.

येथे आपण एक मुद्दा मांडला की, तुर्कांनी कॉन्सटेंटिनोपल वर हल्ला केल्यानंतर येथील मंडळींनी पलायन केले. पलायन करण्यामागचे एक प्रमुख कारण असे होते की, तुर्क हे धर्माने मुस्लीम होते, तर येथील युरोपियन मंडळी ख्रिस्त होती. त्यामुळे धर्माने मुस्लीम असलेले तुर्क आपले धर्मांतर घडवून आणतील अशी भीती देखील त्यांच्या मनात निश्चितपणे असणार यात वाद नाही.

प्रबोधनाची चळवळ सुरू झाल्यानंतर संपूर्ण युरोपमध्ये कला, स्थापत्यशास्त्र, चित्रकला, साहित्य, विज्ञान आदी क्षेत्रांमध्ये प्रगती होण्यास सुरुवात झाली. तसेच समाजावरील धार्मिक पगडा कमी होण्यास सुरुवात होऊन जनमानसामध्ये मानवतावादी दृष्टिकोन बळकट होऊ लागला. धर्म ही आवश्यक बाब आहे; परंतु त्यासोबतच मानवी जीवन व आकांक्षा देखील तेवढ्याच महत्त्वाच्या याची जाणीव होऊ लागली.

कलेच्या क्षेत्राचा विचार केला तर स्थापत्यकलेचा

नवा आविष्कार या काळात झालेला निदर्शनास येतो. फिलिपो ब्रुनेल्शी, लियॉन बतीस्ता अलबर्ती, डोनाटो ब्रॅमान्टे, अँड्री पॅलाडियो या व इतर अनेक वास्तुविशारदकारांनी आपल्या कल्पनेतून भव्य वास्तुंची निर्मिती केली.

ज्याप्रमाणे स्थापत्यशास्त्रात प्रगती झाली त्याचप्रमाणे चित्रकलेच्या क्षेत्रात देखील महान चित्रकारांनी अतिशय सुंदर चित्रे काढून या कलेला एका नवीन उंचीवर नेऊन ठेवले. प्रबोधन काळातील काही महान चित्रकारांची नावे पुढीलप्रमाणे आहेत - लियो नार्डो डाविंची, मायकेलएंजेलो, राफेल, डोनाटेलो, सँड्रो बोटीसेली. येथे नमूद केलेल्या चित्रकारां व्यतिरिक्त इतर अनेक चित्रकारांनी रेखीव, सुंदर व जिवंत वाटणारी चित्रे काढलेली आढळतात.

साहित्याच्या क्षेत्रात विल्यम शेक्सपियर, मिग्यूल डे करवान्तेस, फ्रान्सिस्को पेट्रार्का, निकोलो मकायवेली, जियोवानी बोकासियो, एडमंड स्पेन्सर, थॉमस मोर या व इतर महान लेखकांनी मोलाची भर घालण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. हे लेखक युरोपमधील वेगवेगळ्या भाषांमध्ये त्या काळात लिहीत होते. ही सर्व लेखक मंडळी व त्यांच्या कलाकृती अजरामर आहेत. आजही लोक यांनी त्याकाळात लिहिलेली पुस्तके आवर्जून वाचतात. उदाहरणच द्यावयाचे झाले तर विल्यम शेक्सपियर हे नाव संपूर्ण जगाला माहिती आहे. अनेक देशांमध्ये शेक्सपियर लिखित इंग्रजीतील मूळ पुस्तके (प्रामुख्याने त्याने लिहिलेली नाटके) वा त्यांची भाषांतरे आनंद घेऊन वाचली जातात. देशोदेशींच्या नाटककारांची व नाट्यकर्मींची आयुष्यात एकदा तरी शेक्सपियरच्या मातृभूमीला म्हणजेच इंग्लंडला जाण्याची व त्याचे गाव व घर बघण्याची इच्छा असते. यावरून शेक्सपियरची चारशे वर्षे पश्चात देखील असलेली लोकप्रियता व त्याच्या साहित्यिक कलाकृतींनी प्राप्त केलेले अमरत्व लक्षात येते.

अगोदर उल्लेख केल्याप्रमाणे प्रबोधन काळात शास्त्रीय शोध व वैज्ञानिक प्रगतीला सुद्धा चालना मिळाली. प्रबोधन काळातील काही प्रसिद्ध शास्त्रज्ञ मंडळी पुढीलप्रमाणे आहेत - निकोलस कोपर्निकस, गॅलिलिओ गॅलीली, जोहानस केपलर, फ्रॅन्सिस बेकन, रॉजर बेकन, सर आयझॅक न्यूटन. इतरही अनेक वैज्ञानिक व शास्त्रज्ञ होते ज्यांनी शास्त्रीय शोध लावून विविध वैज्ञानिक तत्थे लोकांसमोर आणली. यामुळे युरोपात सामान्य जनतेमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित झाला. त्यामुळे हे देश आधुनिक बनू शकले. पुढे चालून शास्त्रीय व वैज्ञानिक ज्ञानाचा उपयोग विविध क्षेत्रांतील तंत्रज्ञान विकसित होण्यासाठी झाला व युरोपियन देशांनी औद्योगिक प्रगती साधली. या औद्योगिक प्रगतीच्या जोरावर युरोपने अनेक शतके जवळ जवळ संपूर्ण जगावर आपले वर्चस्व गाजवले. युरोपातील औद्योगिकदृष्ट्या विकसित देशांनी अमेरिका, आफ्रिका, आशिया तसेच इतर भागांतील देशांवर वसाहतीकरणाच्या माध्यमातून वर्चस्व गाजवले. औद्योगिकीकरणामुळे या देशांचा आर्थिक विकास झाला. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात व दरडोई उत्पन्नात वाढ झाली व सामान्य लोकांचे एकूणच जीवनमान व राहणीमान उंचावले. आपणास आजचा जो आधुनिक व पुढारलेला युरोप दिसतो त्याचे श्रेय प्रबोधनाच्या चळवळीला जाते यात वाद नाही.

स्थापत्यकलेचा विचार केला तर युरोपमध्ये फ्लॉरेन्स मधील कॅथेड्रलचा घुमट, सेंट पिटर्स बॅसिलिका, सँटो स्पिरिटोचा चर्च, सॅन लॉरेंझो चार चर्च, पाझी चॅपेल, व्हिला रोतोंदा, इत्यादी सुंदर वास्तुंचे निर्माण इटलीत झाले. इटलीप्रमाणेच युरोपातील इतर देशांमध्ये देखील भव्य वास्तुंचे निर्माण झाले.

चित्रकलेच्या क्षेत्रात विविध चित्रकारांनी लॅमेंटेशन ऑफ ख्राईस्ट, ॲडोरेशन ऑफ द मॅगी, प्रेझेंटेशन ऑफ ख्राईस्ट इन द टेंपल, कोरोनेशन ऑफ द वर्जीन अँड सेंट्स, ट्रिब्यून मनी, एक्सपलशन फ्रॉम पॅराडाईज, द क्रुसिफिकेशन, मॅडोना अँड सेंट्स, द ॲडोरेशन ऑफ द मॅगी, मॅडोना ऑफ द मॅग्निफिकंस, कोरोनेशन ऑफ द वर्जीन, सेंट सेबॅस्टियन अँड सेंट ऑगस्टाईन, द युथ ऑफ द मोझेस, टेम्पटेशन ऑफ ख्राईस्ट, द बर्थ ऑफ वीनस, द लास्ट सप्पर, मोनालिसा, मॅडोना ऑफ द रॉक्स, मॅरेज ऑफ द व्हर्जीन, सिस्टाईन मॅडोना, स्कूल ऑफ अथेन्स, मॅडोना ऑफ द गोल्ड फिंच, द क्रिएशन ऑफ ॲडम, रेप ऑफ युरोपा द डिसेंट फ्रॉम द क्रॉस, रिटर्न ऑफ द हंटर द ज्यूईश ब्राईड, ब्लाईंडिंग ऑफ सॅमसन, पोर्ट्रेट ऑफ अ मॅन अँड हिज वाईफ, पोर्ट्रेट ऑफ मॅन सिक्स, जेकब ब्लेसिंग द सन्स ऑफ जोसेफ, रिटर्न ऑफ द प्रॉडिगल सन, द फाईंडिंग ऑफ मोझेस, ख्राईस्ट हिलिंग द सिक, द नाईट वॉच मार्टर्यरडम ऑफ सेंट मॉरीस द बरियल ऑफ काऊंट ऑर्गाझ, द पोर्ट्रेट ऑफ ईरॅसमस ही व इतर अनेक चित्रे काढली. ही चित्रे काढणारे बरेचसे चित्रकार इटलीतील होते. परंतु इतर युरोपीय देशांतील चित्रकारांनी देखील चित्रकलेच्या क्षेत्रात मोठे योगदान दिलेले आढळते. चित्रकलेच्या अनुषंगाने येथे एक गोष्ट आवर्जून सांगितली पाहिजे व ती अशी की, यातील बरीचशी चित्रे ही भित्तीचित्रे देखील होती. विविध चर्चची जातकुळी म्हणा ना, भिंतींवर यातील अनेक चित्रे वर नमूद केलेल्या तत्कालीन चित्रकारांनी काढलेली आढळतात.

साहित्याच्या क्षेत्रात म्हटले तर युरोपमधील विविध भाषांमध्ये ला डिवीना कॉमेडिया (डिव्हाईन कॉमेडी), आफ्रिका, द डिकॅमरॉन, द प्रिन्स, कँटबरी टेल्स, द युटोपिया, फेयरी क्वीन, अँटनी अँड क्लियोपॅट्रा, ऑथेल्लो, ज्यूलियस सीझर, हॅमलेट, रोमियो अँड ज्यूलियट, ॲज यू लाइक ईट, किंग लियर, मॅकबेथ, द मर्चंट ऑफ व्हेनीस, ट्वेल्थ नाईट, गॅरगांटूआ अँड पँटाग्रूएल डॉन क्विक्झोट, द ल्यूसियॅड्स हँडबूक ऑफ अ ख्रिश्चन सोल्जर, इन प्रेज ऑफ फॉली, ही व इतर अनेक पुस्तके लिहिली गेली. ही पुस्तके युरोपमधील, लॅटिन, इटालियन, स्पॅनिश, इंग्लीश, फ्रेंच इत्यादी भाषांमध्ये लिहिली गेली.

विविध शास्त्रज्ञ व वैज्ञानिकांनी पदार्थविज्ञान, खगोलशास्त्र, आरोग्यशास्त्र इत्यादी शास्त्रांतील दानात भर घातली, तसेच नवीन शोध लावले. शास्त्रज्ञांनी, 'वैज्ञानिक प्रयोग करण्यासाठी आवश्यक उपकरणयुक्त प्रयोगशाळेची गरज असते' हे अधोरेखित केले.

प्रबोधन काळात मोठ्या प्रमाणात विकसित झालेली अजून एक महत्त्वाची कला म्हणजे शिल्पकला वा मूर्तीकला होय. निकोला अँड गियोवानी, लॉरेंझो गिबर्ती, डोनॅटिलो, मायकेलएंजेलो, आदि शिल्पकारांनी सुंदर व सुबक शिल्पं घडवली. यात द मॅसॅकर ऑफ इनोसंट्स, डेविड, इव्हिनिंग अँड डॉन, मोझेस आदी शिल्पांचा समावेश आहे.

कुठल्याही देशात एक प्रगल्भ, संवेदनशील व आधुनिक समाज निर्माण होण्यासाठी अशी प्रबोधनासारखी बुद्धीप्रामाण्यवादी चळवळ होण्याची गरज असते. युरोपमध्ये ती चळवळ झाली व युरोपचा चेहरामोहरा बदलून गेला. प्रबोधना पूर्वीचा युरोप व प्रबोधनानंतरचा युरोप असे दोन भाग वा कालखंड ठळकपणे दिसून येतात. प्रबोधनपूर्व युरोप अंधारमय व मागासलेपणाच्या गर्तेत अडकलेला तर प्रबोधनानंतरचा युरोप आधुनिक, संवेदनशील व विज्ञानवादी असल्याचे निदर्शनास येते.

प्रबोधनाच्या चळवळीतच युरोपमधील मध्ययुगीन काळात झालेल्या धर्मसुधारणा चळवळीची पाळेमुळे

(पृष्ठ क्र.१३ वर)

# कवितेविषयी काही निरीक्षणे

*कविता कशी असायला हवी? यावर प्रस्तुत लेखात डॉ आनंद कुलकर्णी यांनी प्रकाश टाकला आहे. या निरीक्षणांच्या शेवटी जोड भाग म्हणून Billy Collins ची कविता दिली आहे - संपादक*

१) कविता कशी असायला हवी? याची अविचल आणि सार्वकालिक व्याख्या नसते. तरीही कवितेविषयी काही निरीक्षणे नोंदवायची असल्यास मी भाषेच्या काटेकोर वापरापासून सुरुवात करेन. अल्पाक्षरी कविता तुलनेने अधिक प्रभावी असतात. 'शब्दांची उधळपट्टी' न केलेली बरी असते. त्यामुळे कविता वाचकाला सैल सोडून पैसे देत नाही.

२) कवितेत विचलन आणि विचरन असतंच; अनिश्चिततेचं दूसरं नाव आहे कविता. त्यामुळे तिचं असं ठरीव प्रमाण नाही आणि ती प्रमाणित नाही.

३) कोणत्याही समजांच्या दोन टोकांमध्ये कविता असते. म्हणजे अधिक-उणं, खरं-खोटं, अशा प्रकारच्या टोकांमध्ये. यातला तोलनबिंदू जराही इकडे-तिकडे सरकला की कविता विधान होते, वाद-विवाद होते, साचेबद्ध विचार होते, वाहून नेणारी भावना होते.

४) कविता प्रश्न आणि उत्तर अशा द्वंद्वाला उघड, तीव्र आणि व्यापक करते. प्रश्न-उत्तराचा अमर्याद विस्तार ती कमीत कमी शब्दात मांडते. आपल्या सगळ्यांचं जगणं म्हणजे प्रश्न-उत्तरांची न संपणारी आणि सतत छळणारी मालिका आहे. उत्तरांचं स्वरूप प्रश्नांची इयत्ता ठरवत असतं. उत्तरं दमदार तेव्हाच असतील जेव्हा प्रश्नांची महत्ता असेल. बुद्धांना पडलेले प्रश्न महत्तम होते म्हणून मग उत्तरही तोलामोलाचीच शोधावी लागणार होती. आपले प्रश्नं खुजे, मिळणारी उत्तरं हलकी. प्रश्न-उत्तराचा हा असा mutually feeding आणि elevating खेळ सुरू असतो. तो कवितेत यायला लागतो. प्रश्नांची सोडवणूक करणारी कविता हलकी, तात्पुरता उपचार करणारी असते. कवितेतून फार मोठे बदल घडत नसतात. त्यामुळे गुंता मांडणे हेच कवितेचं काम असतं.

५) कवी प्रस्थापित झाला/झाली की शब्दांचे आळोखे-पिळोखे दिले तरी कविता टपाटप गळतात. कविता प्रसिद्ध किंवा प्रस्थापित होण्यासाठी नसतेच. कविता सतत स्वत:लाच मोडीत काढणारा आणि नवं शोधणारा प्रकार आहे. स्थिरावते ती कविता नसते. मोडून पुन्हा नव्याने स्वत:ला घडवते ती कविता असते. मग जर कविताच प्रस्थापित होतं नाही तर कवी कसा प्रस्थापित होईल? आशयाचा अस्सलपणा आणि शुद्धता या प्रचंड दबावाखाली कविता सतत कात टाकत राहते. ज्यांची कविता कात टाकत नाही आणि जडावून थांबते त्यांची कविता प्रस्थापित होते.

६) प्रस्थापित झालं की कवितेला व्यक्तीगत इच्छा-आकांक्षाच्या पातळीवर खाली ओढून तिला आणि कवीला स्वत:लाही इतरांच्या स्वाधीन करावं लागतं. कविता प्रस्थापित झाली की पराधीन होते कारण मग तिला सत्कार-समारंभांची चटक लागते. प्रस्थापित झाल्यावर स्पर्धा येते-स्वत:शी आणि इतरांशीही. मग कविता 'अंतरीचे धावे

स्वभावे बाहेरी' अशी राहात नाही. ती झाडांना पानं यावीत इतक्या सहजतेने येत नाही. ती तडजोडी करत येते. लोकांना आवडतील असे आकार घेत, आशय गुंडाळून ठेवून फक्त चमकदार वाक्यांश फेकत राहते. प्रस्थापित होणं हा कवितेचा अस्त असतो आणि कवीचा उदय असतो!

७) कवितेत ठरवून घडवलेल्या चमत्कृती नकोत. ती येईल तसं तिचं स्वागत करायला हवं, मुक्तपणे वाहू द्यायला हवं.

Introduction to Poetry
Billy Collins

I ask them to take a poem
and hold it up to the light
like a color slide

or press an ear against its hive.

I say drop a mouse into a poem
and watch him probe his way out,

or walk inside the poem's room
and feel the walls for a light switch.

I want them to waterski
across the surface of a poem
waving at the author's name on the shore.

But all they want to do
is tie the poem to a chair with rope
and torture a confession out of it.

They begin beating it with a hose
to find out what it really means.

**– डॉ. आनंद कुलकर्णी**
इंग्रजी विभाग प्रमुख
ग्रामोन्नती मंडळाचे कला विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, वारुलवाडी, नारायणगाव
ता. जुन्नर, जि. पुणे – ४१०५०४

•••

(पृष्ठ क्र.११ वरून – **युरोपातील प्रबोधन चळवळ**)

होती असे म्हणणे वावगे ठरू नये. प्रबोधनामुळे शिक्षणाचा प्रसार प्रामुख्याने तत्सम देशांतील स्थानीय भाषांमध्ये झाला. शिक्षणाच्या प्रसारामुळे लोकांच्या मनावरील धार्मिक पगडा कमी होण्यास मदत झाली व त्यांनी धर्मसत्तेस झिडकारून लावले. लोकांच्या एक गोष्ट लक्षात आली व ती कायमस्वरूपी डोक्यात बसली, ती गोष्ट अशी की, 'धर्म आपल्यासाठी असतो, आपण धर्मासाठी नाही.' त्यामुळे लोकांनी आंधळेपणाने धर्मगुरूंच्या व प्रामुख्याने पोपच्या आज्ञा पाळणे बंद केले.

वरील सर्व विवेचनावरून लक्षात येते की, प्रबोधनाच्या चळवळीने युरोपातील जीवनात सकारात्मक बदल घडवून आणून, तेथील लोकांचे जीवन समृद्ध केले. अशाच प्रकारचे प्रबोधन एकोणिसाव्या शतकात भारतात व प्रामुख्याने महाराष्ट्रात झाले व आपला समाज देखील अंधश्रद्धेच्या गर्तेतून बाहेर निघून प्रगत व विकसित होण्याची प्रक्रिया सुरू झाली.

**– सहा. प्राध्यापक सुभाष गंगाराम शिंदे**
उपप्राचार्य व इतिहास विभागप्रमुख
विप्रमंचे जोशी-बेडेकर (स्वायत्त), महाविद्यालय
ठाणे (पश्चिम)– ४००६०६
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email : subhashinscotland@gmail.com

•••

***दिशा संपर्क दूरध्वनी***
***०२२-२५४२ ६२७०***

# बौद्ध दर्शन

*प्रस्तुत लेखात 'बौद्ध' विषयाबाबत किंचीत महत्त्वाचे मुद्दे मांडलेले आहेत; की जेणेकरून या विषयाबाबत पूर्ण माहिती करून घेण्याची उत्सुकता वाचकांची मनात निश्चितपणे 'जागी' होईल; हे या लेखाचे महत्त्व होय. - संपादक*

## बुद्धजयंतीचे माहात्म्य



वैशाख पौर्णिमेला गौतम बुद्ध (जन्मः इसवीसन पूर्व ५६३ वर्षे; निर्वाणः इसवीसन पूर्व ४८३ वर्षे) यांचा जन्म लुम्बिनी येथे झाला. वयाच्या ३५-व्या वर्षी म्हणजेच इसवीसन पूर्व ५२८ वर्षे, बुद्धगया येथील बोधीवृक्षाखाली त्यांना वैशाख पौर्णिमेलाच ज्ञानप्राप्ती झाली होती. तसेच, वयाच्या ८०व्या वर्षी, इसवीसन पूर्व ४८३ वर्षे, वैशाख पौर्णिमेलाच कुशीनगर येथे गौतम बुद्धांचे निर्वाण झाले.

बुद्धजयंती किंवा बुद्ध पौर्णिमा हा बौद्ध धर्मीयांचा सर्वांत महत्त्वाचा उत्सव आहे. हा सण जगभरात विशेषतः भारतात वैशाख पौर्णिमेच्या दिवशी साजरा केला जातो. आपल्या मानवतावादी आणि विज्ञानवादी धम्म सिद्धांतांमुळे तथागत बुद्धांना जगातील महापुरुष आणि गुरू मानले जाते. बौद्ध धर्मीयांची मोठ्या प्रमाणावर संख्या असणाऱ्या चीन, जपान, व्हिएतनाम, थायलंड, भारत, म्यानमार, श्रीलंका, सिंगापूर, अमेरिका, कंबोडिया, मलेशिया, नेपाळ, इंडोनेशिया या देशांसह, सुमारे १८० देशांतील बौद्ध लोक हा सण उत्साहात साजरा करतात. यातील अनेक देशांत बुद्ध जयंतीची सार्वजनिक सुट्टी असते. भारतात देखील बुद्ध पौर्णिमेनिमित्त सार्वजनिक सुट्टी असते.

## भारतातील बुद्धजयंतीचा इतिहास

डॉ. बाबासाहेब आंबेडकर (जन्मः १४ एप्रिल १८९१, महू; मृत्यूः ६ डिसेंबर १९५६, नवी दिल्ली) यांच्या अध्यक्षतेखाली २ मे १९५० रोजी भारतात



पहिली सार्वजनिक बुद्ध जयंती, दिल्ली येथे साजरी झाली. अशाप्रकारे भारतात बुद्धजयंती महोत्सवाच्या परंपरेची सुरुवात बाबासाहेब आंबेडकर यांनी केली, म्हणून ते 'भारतातील सार्वजनिक बुद्धजयंती महोत्सवाचे प्रणेते' ठरतात. बुद्ध जयंती दिनी सार्वजनिक सुट्टी असावी ही १९४२ पासूनच मागणी होती. आंबेडकरांच्या प्रयत्नांमुळे २७ मे १९५३ रोजी केंद्र सरकारने बुद्धजयंतीनिमित्त सार्वजनिक सुट्टी जाहीर केली. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी, विजयादशमीच्या दिवशी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथील 'दीक्षाभूमी' मैदानावर

लाखो सहकार्यांसह बौद्ध धर्मात प्रवेश केला. ‘धम्मचक्रप्रवर्तन’ केले.

**चार आर्य सत्ये**

प्रथमावस्थेतील बौद्ध धर्म हा अगदी साधा, समजण्यास सोपा, नैतिक तत्त्वांवर भिस्त ठेवणारा; मानवता, करुणा आणि समानता यांचा पुरस्कार करणारा असा होता. या काळात बुद्ध हा असामान्य गुणवत्ता असलेला, पण मानवदेह धारण करणाराच मानला जात होता. या जगात अबाधित सत्ये कोणती आहेत आणि जगाचे रहाटगाडगे कसे चालते, या संबंधीचे ज्ञान त्यांना बोधिवृक्षाखाली प्राप्त झाले. त्यांना प्रथम चार आर्य सत्यांचा साक्षात्कार झाला. त्याआधारे त्यांनी जगास, दुःखनिवारणाचा जो आचारधर्म सांगितला, त्यालाच ‘बौद्ध धर्म’ असे म्हणतात. ती चार आर्य सत्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१. दुःख सर्वत्र पसरलेले आहे.

२. हाव हे सर्व दुःखांचे मूळ आहे.

३. हाव नाहीशी केली तर दुःखही नाहीसे होऊ शकते.

४. हाव नाहीशी करण्याचा मार्गही असलाच पाहिजे.

**त्रिशरणतेचे दोन प्रकार –**

बुद्ध तत्त्वज्ञान हे जगाच्या पाठीवरचे एक इहवादी, समतेचे, न्यायाचे, बंधुतेचे तत्त्वज्ञान आहे. बुद्ध वास्तववादी आहे. मानवी जीवनात उत्कट असा समतोल निर्माण झाला पाहिजे हे धम्माचे ब्रीद आहे. बौद्ध धम्मात बुद्ध, धम्म, व संघ ही त्रि–रत्ने आहेत.

बुद्ध : बुद्ध म्हणजे जागृत व्यक्ती, ज्याने बुद्धत्व (ज्ञान) मिळवलेले आहे.

धम्म : बुद्धांच्या शिकवणुकीला ‘धम्म’ असे म्हटले जाते.

संघ : बुद्धांच्या शिकवणुकीनुसार वागणाऱ्या भिक्खू–भिक्खूणींच्या समूहास ‘संघ’ म्हणतात.

या त्रि–रत्नांना शरण जाण्याला ‘त्रिशरणता’ असे म्हणतात. इथे उतरंड नीट लक्षात घ्या. प्रथम बुद्धशरणता, त्याहून उच्चतर धम्मशरणता आणि सर्वोपरी संघशरणता. विद्वान व्यक्ती, ‘आळशाला पोसू नका’ म्हणेल तर ते ऐकले पाहिजे. ‘धार्मिक, करुणाकर व्यक्ती, त्याचीही उपासमार होऊ देऊ नका’ म्हणेल, तर ते अधिक मोलाचे मानले पाहिजे. मात्र समष्टीकरता जर त्या व्यक्तीचे आळशी होणे श्रेयस्कर ठरत नसेल तर, त्यास सर्वाधिक प्राधान्य देऊन त्यावरच अंमल केला पाहिजे. अशी बौद्ध धर्माची शिकवण आहे. या कारणेच संघहितार्थ, सिद्धार्थ परिव्रज्या घेण्यास सिद्ध झाले होते. (१; पृ.२७, १३,१४,१५; पृ.२८., २).

संघशरणतेतच सर्व प्राणिमात्रांचे हित सामावलेले आहे याची सम्यक जाण, हे बौद्ध धर्माचे व्यवच्छेदक लक्षण आहे. तो संपूर्णतः लोकशाहीवादी असल्याचे ते निदर्शक आहे.

सिद्धार्थांना वैदिक धर्माबाबत काही मूलभूत आक्षेप होते. उदाहरणार्थः

१. वेद हे अपौरुषेय आहेत असे मानणे याचा अर्थ विचारस्वातंत्र्याला संपूर्ण नकार देणे असाच होय. निर्दोष व वादातीत असे काहीच नसते. कोणत्याही गोष्टीची फेरतपासणी आणि फेरविचार करण्यास प्रत्यवाय नसावा. माणसाला सत्य –यथार्थ सत्य– समजले पाहिजे. विचारस्वातंत्र्य ही सर्वांत महत्त्वाची आणि आवश्यक बाब आहे. सत्यशोधनाचा एकमेव मार्ग विचारस्वातंत्र्य असणे हा आहे. (१; पृ.७५,२१,२२,२३,२४).

२. दुसऱ्याला दुःख देऊन स्वतःच्या सुखाकरता केलेला यज्ञ, सुख कसे देऊ शकेल? यज्ञात तथ्य असते.

दुसऱ्याच्या हितार्थ स्वहिताचा त्याग करणे म्हणजे खरा यज्ञ होय. वैयक्तिक स्वार्थासाठी पशुबळी देणे, हा यज्ञ खोटा आहे. (१; पृ.७५, २५,२६,२७,२८,२९).

३. जन्मावर आधारित कायमस्वरूपी चातुर्वर्ण्य व्यवस्था नैसर्गिक न्याय कसा देऊ शकेल? विशिष्ट वर्गाच्या मतलबानुसार तयार केलेली ती समाजरचना होती. व्यक्तीच्या जन्मजात दर्जावर ती आधारलेली होती. योग्यता आणि प्रगती यांना त्या समाजरचनेत स्थान नव्हते. (१; पृ.७६, ३०,३१).

४. दुःखनिवारणार्थ ब्राह्मणी धर्मात असलेला कर्मसिद्धांत दुःखनिवारण कसे करू शकेल? (१; पृ.७७, ४०). बंडाची प्रवृत्ती पूर्णपणे मारून टाकण्यासाठीच ब्राह्मणांनी कर्मवाद तयार केलेला होता असे बुद्धाचे मत होते. मनुष्याच्या दुःखाला त्याच्या स्वतःशिवाय दुसरा कुणीही जबाबदार नव्हता. दुःखाची स्थिती, तो बंड करून बदलू शकत नव्हता. कारण पूर्वजन्मातील कर्मामुळेच या जन्मातील त्याची अवस्था दुःखद असल्याचे ठरवण्यात आलेले होते.

५. ज्या ब्राह्मण तत्त्वज्ञानाने, ज्यांची माणुसकी पार नष्ट करून टाकली होती, त्या शूद्र आणि स्त्रिया या दोन वर्गांना, ते नैसर्गिक न्याय देऊ शकेल काय? वस्तुतः शूद्र आणि स्त्रिया या दोन वर्गांना चातुर्वर्ण्य आणि आश्रमव्यवस्थेत शिक्षणाचा व स्व-उन्नयनाचा हक्कच नाकारण्यात आलेला होता. समाजाचा एवढा मोठा हिस्सा सामाजिक प्रगतीत सहभागीच होण्यापासून वंचित ठेवला गेल्यास सामाजिक प्रगती अवरुद्ध होणार नाही काय? (१; पृ.७४, ९,११,१२,१३,१४,१५,१६,१७).

सनातन वैदिक धर्मात शिरलेल्या अवगुणांवर ओढलेले हे ताशेरेच होते. खरे तर 'वैदिक धर्मा'ने ते मान्य करून स्व-सुधार करावा अशी अपेक्षा होती. मात्र ज्या त्वरेने हे घडून यावे त्या त्वरेने हे साधणारच नाही. शिवाय संघर्षाची शक्यता निर्माण होईल हे लक्षात घेता, दुःखनिवारणाचा ठोस उपाय सांगणारा नवाच धर्म सिद्धार्थांनी उपदेशिला. सत्य, अहिंसा आणि अस्तेय हे यमही स्वीकारले आणि तप, स्वाध्याय आणि संतोष हे नियमही स्वीकारले. 'दैवायत्तं कुले जन्म, मदायत्तं तु पौरुषम्' या सुभाषितास मूर्तता देणारा धर्म नव्याने प्रस्थापित केला. एरव्हीच्या वैदिक धर्मातील अष्टांगयोगादी[१] तपशीलांशी सिद्धार्थ सामान्यतः सहमतच होते असे दिसते. तरीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, 'बुद्धाने काय त्याज्य ठरवले?', 'बुद्धाने कोणते बदल केले?' आणि 'बुद्धाने काय स्वीकारले?' हे मुळातूनच जाणून घेणे उचित ठरेल. (१; पृ.-८२).

**बुद्धाने काय त्याज्य ठरवले?**

१. मी कोण आहे, कुठून आलो, कुठे जाणार? याविषयी कल्पना करीत बसण्याच्या वृत्तीचा त्याने धिक्कार केला.

२. आत्म्याचे थोतांड त्याने धुडकावून लावले आणि शरीर, संवेदना, चेतना आणि विज्ञान यापैकी कशालाही आत्मा मानण्याच्या कल्पनेचा त्याने त्याग केला.

३. काही शून्यवादी मते त्याने त्याज्य ठरवली.

---

[१]अष्टांगयोगात कैवल्य म्हणजेच मोक्षप्राप्तीचा मार्ग; यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी ह्या टप्प्यांनी प्रगत होतो; असे सांगितलेले आहे. अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह आणि ब्रह्मचर्य हे पाच यम आहेत. शौच, संतोष, तप, स्वाध्याय आणि ईश्वरप्रणिधान हे पाच नियम आहेत. दैनंदिन जीवनात यम-नियमांचे पालन करणे, अष्टांग योगाचा महत्त्वाचा भाग आहे.

४. पाखंडी मताचा त्याने धिक्कार केला.

५. 'विश्वाच्या विकासाचा प्रारंभ काळ सांगता येतो' हे म्हणणे त्याने अमान्य केले.

६. देवाने माणसाला निर्माण केले किंवा ब्रह्म नावाच्या कोण्या एकाच्या शरीरातून त्याचा जन्म झाला हे म्हणणे त्याने त्याज्य ठरवले.

७. आत्म्याच्या अस्तित्वाकडे त्याने दुर्लक्ष तरी केले किंवा ते नाकारले.

**बुद्धाने कोणते बदल केले?**

१. कार्यकारणभावाचा अत्यंत महत्त्वाचा नियम आणि त्याचे उप-सिद्धांत त्याने मान्य केले.

२. जीवनाचा दैववादी दृष्टिकोन आणि मनुष्य व जग यांचे भवितव्य देवाने पूर्वनियोजित केलेले आहे हा तितकाच मूर्खपणाचा दृष्टिकोन हे दोन्हीही त्याने त्याज्य ठरविले.

३. एखाद्या पूर्वजन्मी केलेल्या कृत्यात दुःख निर्माण करण्याचे आणि त्या जन्मातील कृत्य परिणाम शून्य करण्याचे सामर्थ्य आहे, हे म्हणणे त्याने अमान्य केले. कर्माचा दैववादी दृष्टिकोन त्याने नाकारला. कर्माच्या या दृष्टिकोनाच्या ऐवजी त्याने अधिक शास्त्रीय दृष्टिकोन स्वीकारला. जुन्याच बाटलीत त्याने नवी दारू ओतली.

४. आत्म्याचा फेरा-संसार या तत्त्वांच्या जागी त्याने पुनर्जन्माच्या सिद्धांताला स्थान दिले.

५. आत्म्याची मुक्ती किंवा मोक्ष या तत्त्वाऐवजी त्याने निब्बाण म्हणजे निर्वाण तत्त्व स्वीकारले.

याप्रमाणे बुद्ध शासन हे संपूर्णतः नव्या विचारांनी भरलेले आहे. त्यात जे काही थोडेसे जुने आहे, ते फेरबदल करून घेतलेले किंवा निराळ्या दृष्टिकोनातूनच मांडलेले असे आहे.

**बुद्धाने काय स्वीकारले?**

१. बुद्धाच्या शिकवणीचे पहिले वैशिष्ट्य असे की, सर्व गोष्टींचा मध्यबिंदू 'मन' आहे हे त्याने मानले.

२. मन सर्व वस्तूंच्या अग्रभागी असते. सर्व वस्तूंत श्रेष्ठ असते. ते सर्व वस्तूंवर अंमल चालवते. त्यांची निर्मिती करते. मनाचे आकलन झाले, की सर्व वस्तूंचे आकलन होते.

३. मन सर्व मानसिक क्रियांचे मार्गदर्शन करते. मन सर्व मानसिक शक्तींचे प्रमुख आहे. मन हे त्या शक्तींचेच बनलेले असते.

४. ज्या बाबींकडे लक्ष पुरवणे आवश्यक आहे, अशी पहिली बाब म्हणजे 'मनाचे संस्कार'.

५. बुद्धाच्या शिकवणीचे दुसरे वैशिष्ट्य असे की, आपल्यामध्ये निर्माण होणाऱ्या आणि आपल्यावर बाहेरून ज्यांचा परिणाम होतो अशा, सर्व बऱ्या-वाईट गोष्टींचे मन हे उगमस्थान आहे.

६. जे जे वाईट आहे, वाईटाशी संबंधित आहे आणि त्याच्या आधीन आहे, ते सर्व मनातूनच उत्पन्न होते.

७. ज्याप्रमाणे गाडी ओढणाऱ्या बैलाच्या पावलांमागोमाग गाडीची चाके जातात त्याप्रमाणे अशुद्ध चित्ताने जो बोलतो किंवा कृती करतो त्याच्या मागोमाग दुःख येते. म्हणून 'चित्तशुती' हे धर्माचे सार होय.

८. बुद्धाच्या शिकवणीचे तिसरे वैशिष्ट्य पाप कृत्य टाळणे हे होय.

९. त्याच्या शिकवणीचे चौथे वैशिष्ट्य असे की, खरा धर्म हा धर्मग्रंथात नसून धर्म तत्त्वांचे पालन करण्यात आहे.

यावरून बुद्धाचा धर्म, ही त्याची स्वतःची निर्मिती नव्हती असे कोणी म्हणू शकेल काय?

**चक्रवर्ती सम्राट अशोक यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला.**

चक्रवर्ती सम्राट अशोक (जन्मः इ.स.पू.-३०४, मृत्यूः इ.स.पू.-२३२) यांनी इ.स.पू.-२७२ ते इ.स.पू.-२३२ दरम्यान अखंड भारतावर राज्य केले. कलिंग युद्धानंतर, त्यात झालेल्या लाखो लोकांच्या शिरकाणातून काय साधले? हा प्रश्न उभा राहिला. त्याचे उत्तर शोधत असता, त्यांचे हृदय परिवर्तन होऊन त्यांनी, प्रकर्षाने अहिंसक असलेल्या बौद्ध धर्माचा स्वीकार केला. एक नवा विचार स्वीकारून आपली राज्यव्यवस्था अधिक सक्षम आणि दृढ केली. त्याच्या शांततेच्या मार्गाचा सकारात्मक परिणाम राज्य-व्यवस्थेवर झाला. राजा आणि राजसत्ताच ज्या धर्मास जवळ करत होती, तिचा स्वीकार मग प्रजेनेही मोठ्या प्रमाणात केला. एवढेच नव्हे तर, त्या सशक्त झालेल्या राजसत्तेने, मग बौद्ध धर्माचा जगभर प्रचार आणि प्रसारही केला. जगात आज ख्रिश्चन धर्म सर्वाधिक लोक अनुसरतात. मात्र त्यानंतर बहुसंख्येने अनुसरला जाणारा धर्म, बौद्धच आहे.

**नागपूरच्या 'दीक्षाभूमी' मैदानावरील धम्मचक्रप्रवर्तन**

नागपूर शहरात ५ लक्ष आंबेडकरांचे अनुयायी आले, तेव्हा नागपूर शहराची लोकसंख्या दुप्पट झाली होती. सम्राट अशोक यांनीही बौद्ध धम्माचा स्वीकार याच दिवशी केला होता. श्रीलंकेचे बौद्ध भिक्खू महास्थविर चंद्रमणी यांचेकडून आंबेडकर व सविता आंबेडकर यांनी त्रिशरण व पंचशील ग्रहण करून, १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बौद्धधम्म दीक्षा घेतली. त्यांनंतर नवदीक्षित बौद्ध आंबेडकरांनी स्वतः आपल्या सुमारे ५ लक्ष अनुयायांना त्रिशरण, पंचशील[२] आणि बावीस प्रतिज्ञा[३] देऊन बौद्ध धम्माची दीक्षा दिली. १५ ऑक्टोबर रोजी सुद्धा

---

[२] पंचशील : https://mr.wikipedia.org/wiki/%E0%-4%--%E0%-4%82%E0%-4%9-%E0%-4%B6%E0%-5%80%E0%-4%B2

पंचशील ही बौद्ध धम्मातील एक आचरण नियमावली आहे. सामान्यत: पाच तत्त्वांना पंचशील म्हणून संबोधले जाते. पंचशील हे पाच नियम आहेत, पाच गुण आहेत. बुद्धांनी सामान्य माणसाकरिता आपल्या शरिरावर नियत्रंण ठेवण्यासाठी व शाब्दिक कृती नियंत्रित करण्यासाठी, त्यापासून परावृत्त होण्याकरिता हे पाच गुण सांगितले आहेत. खालील पाच शीलांची शिकवण तथागत बुद्धांनी आपल्या शिष्यांना दिली होती. सामान्यत: जगातील सर्व बौद्ध पाचही शीलाचे पालन करतात.

पंचशीलाचा पाली व मराठीतील अनुवाद पुढील प्रमाणे.

१) पाणातिपाता वेरमणी सिक्खापदं समादियामी (अर्थ: मी जीव हिंसेपासून अलिप्त राहीन.)
२) अदिन्नदाना वेरमणी सिक्खापदं समादियामी (अर्थः मी चोरी करण्यापासून अलिप्त राहीन.)
३) कामेसुमिच्छाचारा वेरमणी सिक्खापदं समादियामी (अर्थ: मी व्यभिचारापासून अलिप्त राहीन.)
४) मुसावादा वेरमणी सिक्खापदं समादियामी (अर्थ: मी खोटे बोलण्यापासून अलिप्त राहीन.)
५) सुरा-मेरय-मज्ज पमादठ्ठाना वेरमणी सिक्खापदं समादियामी (अर्थ: मी मादक वस्तूच्या सेवनापासून अलिप्त राहीन.)

वरील पाचही गुण महत्त्वाचे आहेत. व्यक्तीने मन व शरीरावर संयम ठेवून, हे पाचही शील आत्मसात केले तर ती व्यक्ती 'शीलवान' बनते.

[३] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्धांना दिलेल्या २२ प्रतिज्ञा खालीलप्रमाणे आहेत.

१. मी ब्रह्मा, विष्णू, महेश यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
२. मी राम व कृष्ण यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
३. मी गौरी-गणपती इत्यादी हिंदू धर्मातील कोणत्याही देव-देवतेस मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
४. देवाने अवतार घेतले, यावर माझा विश्वास नाही.

---

३ लक्ष अनुयायांना दीक्षा दिली, तर चंद्रपूर येथे १६ ऑक्टोबर रोजी ३ लक्ष लोकांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली. त्यांचे धर्मांतर, जगातील एक सर्वात मोठे सामूहिक धर्मांतर होते. आंबेडकरांना बौद्ध धर्माचे प्रवर्तक, तसेच बौद्ध धर्माचे पुनरूज्जीवक म्हटले जाऊ लागले. महापरिनिर्वाणापर्यंत आंबेडकरांनी ३० लाखांपेक्षा जास्त लोकांना बौद्ध धर्मात आणण्याचे कार्य केले. सम्राट अशोकानंतर बौद्ध धर्माचे प्रसारकार्य, आंबेडकरांएवढे इतर कोणत्याही भारतीयाने केलेले नाही.

धम्मरक्षणार्थ संघ १; पृ.-३१९

बुद्ध धम्माच्या दीक्षा दोन प्रकारच्या दिल्या जातात. 'उपासक' म्हणून आणि 'भिख्खू' वा 'भिख्खुणी' म्हणून. उपासकांची संघटना नसते. उपासकांना 'त्रिशरण'ता आणि 'दशशीलां'चा[४] स्वीकार करावा लागतो. मात्र भिख्खू भिख्खुणींना संघ असतो. भिख्खू हा मुख्यतः परिव्राजक असतो. परिव्राजक ही संस्था बुद्ध धम्माच्या पूर्वीपासून अस्तित्वात आहे. कौटुंबिक जीवनाचा त्याग करून इतस्ततः परिभ्रमण करणारे लोक म्हणजे परिव्राजक. परिव्राजकांचा संघ नसतो, त्यांचे नीतिनियमही नसतात आणि उद्दिष्टेही स्पष्ट नसतात. मात्र बौद्ध भिख्खू, संघाचे सदस्य असतात. त्यास जबाबदार असतात. भिख्खूंचा संघ वेगळा असतो आणि भिक्षुणींचा संघ वेगळा असतो. भिख्खूंना 'अपरिग्रह' स्वीकारावा लागतो आणि अनुज्ञा नसलेल्या वस्तू जवळ बाळगण्यासही परवानगी नसते.

---

५. गौतम बुद्ध हा विष्णूचा अवतार होय, हा खोटा आणि खोडसळ प्रचार होय असे मी मानतो.

६. मी श्राद्धपक्ष करणार नाही; पिंडदान करणार नाही.

७. मी बौद्धधम्माच्या विरुद्ध विसंगत असे कोणतेही आचरण करणार नाही.

८. मी कोणतेही क्रियाकर्म ब्राह्मणाचे हातून करवून घेणार नाही.

९. सर्व मनुष्यमात्र समान आहेत असे मी मानतो.

१०. मी समता स्थापन करण्याचा प्रयत्न करीन.

११. मी तथागत बुद्धाने सांगितलेल्या अष्टांग मार्गाचा अवलंब करीन.

१२. तथागताने सांगितलेल्या दहा पारमिता मी पाळीन. (धर्मानंद कोसंबी यांनी 'दान', 'शील', 'नैष्कर्म्य', 'प्रज्ञा', 'वीर्य', 'शांति', 'सत्य', 'अधिष्ठान', 'मैत्री' व 'उपेक्षा' अशा दहा पारमिता आपल्या जातक कथासंग्रहात (१९७८) दिलेल्या आहेत.)

१३. मी सर्व प्राणिमात्रांवर दया करीन, त्यांचे लालन पालन करीन.

१४. मी चोरी करणार नाही.

१५. मी व्यभिचार करणार नाही.

१६. मी खोटे बोलणार नाही.

१७. मी दारू पिणार नाही.

१८. ज्ञान (प्रज्ञा), शील, करुणा या बौद्धधम्माच्या तीन तत्त्वांची सांगड घालून मी माझे जीवन व्यतीत करीन.

१९. माझ्या जुन्या, मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला हानिकारक असणाऱ्या व मनुष्यमात्राला असमान व नीच मानणाऱ्या हिंदू धर्माचा मी त्याग करतो व बौद्धधम्माचा स्वीकार करतो.

२०. तोच सद्धम्म आहे अशी माझी खात्री पटलेली आहे.

२१. आज माझा नवा जन्म होत आहे असे मी मानतो.

२२. इतःपर मी बुद्धाच्या शिकवणुकीप्रमाणे वागेन अशी प्रतिज्ञा करतो.

[४] दशशीलेः अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य यांचा सांभाळ. शरीर-अलंकरणांचा त्याग. अवेळी अन्नसेवनाचा त्याग. मद्यत्याग. असभ्य आणि अनैतिक कृत्यांचा त्याग. ऐष-आरामांचा त्याग आणि सोनेचांदीच्या लोभाचा त्याग.

---

धम्मरक्षण करायचे तर केवळ धर्म स्वीकार केल्याने भागत नाही. धम्माचे नीतिनियम पाळले जातात की नाही त्यावर देखरेख करणारा 'संघ'ही आवश्यक असतो. असे मानणे, हे बौद्ध धम्माचे एक ठळक वैशिष्ट्य आहे. संघात कुणालाही प्रवेश करता येतो. मग ती स्त्री असो वा पुरुष, त्याकरता कोणत्याही वंशाची वा जातीची अट नसते, कोणत्याही सामाजिक प्रतिष्ठेची आवश्यकता नसते आणि उच्च-नीच भेदभाव नसतो.

ज्या अर्थाने गौतम बुद्धांना संघाची आवश्यकता जाणवली होती, अगदी तशीच आवश्यकता हिंदू धर्माच्या रक्षणार्थही आहे, असे जाणवल्यामुळे डॉ. केशव बळिराम हेडगेवार (जन्मः १ एप्रिल १८८९, नागपूर; मृत्यूः २१ जून १९४०, नागपूर) यांनी १९२५ सालच्या विजयादशमीस, नागपुरात, 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघा'ची स्थापना केली होती. समाजातील वाढत्या तुसड्या वृत्तीस आळा घालण्याकरता, दैनंदिन शाखा आवश्यक आहेत, हे जाणून त्या रुजवण्याकरता त्यांनी आयुष्य वेचले.

हिंदूंमध्ये प्रबल संघटना असावी, हिंदूंतली विघटना अवघी टळावी ।

हिंदूत्व वर्धन घडो म्हणूनी तदर्थ, तू 'संघ संघ' जप मंत्र निजांतरात ।। ५।।

असे ब्रीद घेऊन ही संघटना घडवली गेली. त्याकरता बौद्ध धम्मरक्षणातील 'संघा'चा पूर्वानुभव नक्कीच उपयोगात आला असेल. आज ही संघटना शतायू होण्याप्रसंगी, भारतातील अनेक दर्शनांतील बौद्ध तत्त्वज्ञान स्मरत असतांना, संघस्थापनेमागची सनातन उद्दिष्टेच डोळ्यांपुढून सरकत आहेत.

**संदर्भ**


१. भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अनुवादक घनशाम तळवटकर, प्राचार्य म. भि. चिटणीस, शा. शं. रेगे, सद्धम्मादित्य प्रकाशन, धम्मचक्र सुवर्ण वर्ष प्रवर्तन दिन २००६, रु.१५०/-, पृ.४४७.

२. बुद्धलीलासार संग्रह, धर्मानंद कौसंबी, साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य, १९१४, तृतियावृत्ती-२००७, रु.८५/-, पृ.३५७.

३. बाबासाहेब आंबेडकर
https://mr.wikipedia.org/wiki/%E0%-4%-C%E0%-4%BE%E0%-4%-C%E0%-4%BE%E0%-4%B8%E0%-4%BE%E0%-4%B9%E0%-5%87%E0%-4%-Cš%E0%-4%86%E0%-4%82%E0%-4%-C%E0%-5%87%E0%-4%-1%E0%-4%95%E0%-4%B0

४. सम्राट अशोक
https://mr.wikipedia.org/wiki/%E0%-4%B8%E0%-4%-E%E0%-5%8D%E0%-4%B0%E0%-4%BE%E0%-4%9Fš%E0%-4%85%E0%-4%B6%E0%-5%8B%E0%-4%95

५. तू संघ संघ जप मंत्र निजांतरात https://nvgole.blogspot.com/2009/05/blog-post_12.html



**– नरेंद्र गोळे**

१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com


•••

# स्वर्गीय माधव जोशी : कल्पक, प्रयोगशील प्रकाशक हरपला

*ठाण्यातील व महाराष्ट्रातील मराठी प्रकाशन विश्वात वेगळी ओळख असलेले परम मित्र पब्लिकेशन्सचे श्री माधव जोशी यांचे दिनांक १३ जून रोजी निधन झाले. त्यांचा प्रकाशन क्षेत्रातील योगदानावर ज्येष्ठ पत्रकार मकरंद मुळे यांनी प्रस्तुत लेखात प्रकाश टाकला आहे – संपादक*



आपल्यासाठी खूप धक्कादायक असतं. कुटुंबावर आभाळ कोसळतं. होत्याच नव्हतं होतं. मात्र, नियतीला ठाऊक असतं. श्वासांचा हिशोब जो ठेवतो त्याला ज्ञात असतं. आपण अनभिज्ञ असतो. आशेवर जगत असतो. चमत्कार होईल असे वाटून घेत असतो. स्वतःला समजावत असतो. आपल्यासाठी मृत्यू अचानक असतो. मृत्यूला सारं काही माहिती असते.

याचा प्रत्यय कल्पक, प्रयोगशील प्रकाशक माधव जोशी यांच्या निधनाने पुन्हा एकदा आला आहे. एप्रिल महिन्यात वयाच्या सहासष्टाव्या वयात पदार्पण करणारे माधव जोशी अवघ्या आठ दिवसांत कोसळले, मृत्यूशी झुंज अपयशी ठरली आणि कायमचे निघून गेले. गेली काही वर्षं मधुमेहाने ग्रस्त. त्यामुळे त्रस्त झालेले आमचे माधवराव काही वेळा निर्वाणीची भाषा करत असत. पण, काम चालू ठेवले होते.

माधव जोशी यांचे बालपण ठाण्यातील तत्त्वज्ञान विद्यापीठात गेले. त्यांचे वडील हे पांडुरंग शास्त्री आठवले यांचे सहकारी होते. स्वाभाविकच माधव जोशी यांच्या जडणघडणीवर तेथील वातावरणाचा परिणाम होता. मो. ह. विद्यालयातून शालेय शिक्षण पूर्ण केल्यावर माधव जोशी यांनी रुईया महाविद्यालयात प्रवेश घेतला. माधव जोशी आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यांची ओळख तिथली. अभाविपच्या संपर्कात आलेल्या माधव जोशी यांनी मानसशास्त्र विषयात एम.ए. ची पदवी प्राप्त केली. महाविद्यालयीन शिक्षण सुरू असताना 'विद्यार्थी विस्तारक' म्हणून मुंबईच्या मध्य विभागात काम केले. त्यानंतर पूर्व मुंबईत काम केले होते. गुजरातच्या राजकोट येथे पूर्णवेळ काम केले होते. अभाविपचे पाच वर्षं पूर्णवेळ काम करताना १९८३ साली गोवाहटी येथे 'घुसखोरी विरोधी आंदोलनात' सहभागी झाले होते. अभाविपचे पूर्णवेळ काम थांबवल्यावर मेघालय आणि आसाम येथे दोन वर्षं नोकरीच्या निमित्त वास्तव्य केले होते.

तेथून परत आल्यावर चरितार्थासाठी 'माध्यम क्षेत्र' निवडले होते. फ्री प्रेस, मुंबई तरुण भारत आणि ग्रंथाली येथे काम केल्यानंतर स्वतःच्या प्रकाशन व्यवसायाला सुरुवात केली होती. परम मित्र पब्लिकेशन्सचा कल्पक, प्रयोगशील पट आखला होता. व्यवसाय स्वतःच्या हिमतीवर सुरू केला होता. प्रकाशन व्यवसाय यावर्षी पाव शतक पूर्ण करेल. आपल्या व्यवसायाची पंचविशी बघण्यासाठी आता माधव जोशी नाहीत. सुरुवातीला द्वै–मासिक प्रसिद्ध करून सुरुवात केली होती. त्यानंतर पुस्तक प्रकाशन सुरू केले. आतापर्यंत सुमारे दोनशे अठ्ठावीस पुस्तकं प्रसिद्ध झाली आहेत. यातील बहुतेक सर्व पुस्तकं ही माधव जोशी यांच्या टर्म्स आणि कंडिशनवर प्रकाशित झाली आहेत. एका टप्प्यानंतर माधव जोशी यांनी आपल्या चॉईसच्या आधारे माणसं

जोडली होती. त्यांच्या मैत्र यादीत सहभागी होण्यासाठी स्पष्टवक्तेपणा पलीकडचा फटकळपणा याची सवय असणे आवश्यक होते. त्यांचे मित्र विविध विचारांचे होते. भिन्न-भिन्न विषयांचे वाचन, माहिती आणि त्याचा एक वेगळा अर्थ मांडणे हे माधव जोशी यांचे वैशिष्ट्य होते. हे वेगळेपण लेखक आणि पुस्तक यातून दिसत असे. ज्येष्ठ इतिहासकार गजानन मेहंदळे यांनी छत्रपती श्रीशिवाजी महाराज यांचे इंग्रजीत दोन खंडात विस्तृत चरित्र लिहिले होते. माधव जोशी यांनी हे शिवधनुष्य पेलले होते. त्या खंडाच्या प्रकाशनाने प्रकाशन व्यवसायात परममित्रने आपले वेगळे स्थान निर्माण केले होते. वैचारिक आणि व्यावसायिकदृष्ट्या प्रकल्प यशस्वी झाला होता. हे सगळं करत असताना तब्येतीची तक्रार काही वेळा माधव जोशी यांना चिडचिड करत असे. मात्र, वेगळं काही करण्याची ऊर्जा त्यांनी कायम ठेवली होती.

आनंद आणि उभारी देणाऱ्या दोन घटना अगदी नुकत्याच घडल्या होत्या. प्रा. डॉ. अशोकराव मोडक यांनी लिहिलेले आणि परम मित्रने प्रसिद्ध केलेले 'अयोध्या आंदोलनाचा ताळेबंद' हे पुस्तक ठाण्यात एका मोठ्या कार्यक्रमात प्रसिद्ध झाले होते. आचार्य गोविंददेव गिरी महाराज आणि रा.स्व. संघाचे ज्येष्ठ प्रचारक भैय्याजी जोशी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम झाला होता. सदर पुस्तकाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्या कार्यक्रमानंतर प्रकाशन व्यवसायातील विशेष कामगिरीबद्दल ठाण्यातील रोटरी क्लबने त्यांना विशेष पुरस्कार देऊन सन्मानित केले होते. या दोन कारणांनी त्यांचे कुटुंब उत्साहात होते. मात्र या दोन्ही वेळी त्यांची प्रकृती हा त्यांना भेटणाऱ्यांच्या काळजीचा विषय होता.

दिनांक चार जून रोजी अरुण करमरकर, शरद गांगल, रवींद्र कर्वे हे राजू (श्रीकृष्ण) हंबर्डे यांच्या घरी निकाल ऐकण्या आणि बघण्यासाठी एकत्र जमले होते. माधव जोशी त्यातही सहभागी झाले होते. मात्र, अस्वस्थ वाटू लागल्याने ते लवकर घरी परतले होते. मंगळवारचा तो दिवस घरी झोपून काढला होता. बुधवारी त्रास सुरू झाला होता. सायंकाळी रुग्णालयात दाखल केले होते. बुधवार दिनांक पाच ते बुधवार दिनांक बारा असा जगण्या-मरण्याचा संघर्ष सुरू होता. तो रात्री संपला. प्रकाशन व्यवसायात वेगळी वाट चालणारे माधव जोशी कायमचे थांबले.

'उंधियो पार्टी' हे माधव जोशी यांच्या घरी जमण्याचे वर्षातून एकदा कारण असायचे. यंदा ती झाली नव्हती. ठाण्यातील विद्यार्थी परिषदेचे जुने आणि सिनियर कार्यकर्ते सहकुटुंब स्वाती जोशी यांच्या हातच्या स्वादिष्ट उंधियोचा आस्वाद घेण्यासाठी एकत्र येत असत. गेल्या काही वर्षांपासून त्यात माझा प्रवेश झाला होता. माधव जोशी यांच्याशी कार्यकर्ता म्हणून ओळख, 'अभाविप ठाण्याच्या अभ्यासवर्गातील वक्ते' म्हणून झाली होती. ती हळूहळू मैत्रीत रूपांतरित झाली होती. महिन्यातून दोनदा माधव जोशी यांच्या घरी दोन कप चहावर सगळ्या विषयांवर भरपूर गप्पा हा ठरलेला कार्यक्रम होता. 'पटणारं, न-पटणारं घर ते जग' कोणतेच विषय वर्ज्य नव्हते. ऐकणारे, समजून घेणारे, समजावून सांगणारे, कधी आपुलकीने रागवणारे ज्येष्ठ मित्र माधव जोशी आता गप्पांसाठी नसतील.

संघटनेचे असूनही संघटनेच्या मोहात अडकले नाहीत. जो विचार अंगिकारला त्याचा गवगवा न करता त्याच्याशी प्रामाणिक राहिले. सगळ्यात राहून आपला एक वेगळा दृष्टीकोन जाणीवपूर्वक जपला होता. माधव जोशी यांच्या आकस्मिक जाण्याने व्यक्त होत असलेली हळहळ ही ब्रँड परम मित्र पब्लिकेशन्स याची ओळख आहे. सुविद्य पत्नी स्वाती जोशी, उच्चशिक्षित मुलगी मुदिता आणि मुलगा भास्वान हे माधव जोशी यांची आठवण म्हणून परममित्रला अधिक सक्षम करतील. प्रवाहाच्या विरोधात पोहण्याचा प्रयत्न करणाऱ्या माधव जोशी यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**- मकरंद मुळे**
ज्येष्ठ पत्रकार,
ठाणे

# संगीतायन

(लेख ४)

## गंगालहरी

*दरवर्षी हिंदू धर्मीय प्रजाजन ज्येष्ठ शुद्ध १ ते ज्येष्ठ शुद्ध १० हा दहा दिवसांचा कालावधी पवित्र महानदी गंगेचे पुण्य स्मरण आणि आशीर्वाद मिळावा म्हणून 'गंगा दशहरा सप्ताह उत्सव' साजरा करतात. यंदा ७ जून ते १६ जून २०२४ हे दहा दिवस हा उत्सव साजरा झाला. त्या निमित्ताने पंडितराज जगन्नाथ यांनी रचलेल्या 'गंगालहरी' या अद्वितीय संस्कृत श्लोक रचना आणि त्या मागची कहाणी याचा थोडक्यात परामर्श 'संगीतायन'च्या या लेखातून मांडला आहे. – संपादक*

लक्षावधी भारतीयांची जीवनदायिनी असलेल्या गंगा नदीला हिंदूधर्मात अतिशय पवित्र मानून तिला 'गंगा माता' म्हणलं जातं. वैदिक काळापासून आकाशात वाहणारी स्वरगंगा, पृथ्वीवर वाहणारी भागीरथी आणि पातळात वाहणारी भोगावती अशी गंगेची त्रिविध रूपं ज्ञात आहेत. भगीरथाने आपल्या पितरांच्या उद्धारासाठी गंगेला स्वर्गातून पृथ्वीवर आणलं तेव्हापासून तिला 'भागीरथी' हे नाव प्राप्त झालं. शंकराने तिला आपल्या मस्तकावर माळेप्रमाणे धारण केली. त्यामुळे कोणत्याही नदीला प्राप्त न झालेलं उच्च स्थान आणि आध्यात्मिक महत्त्व गंगेला प्राप्त झालं. या गंगा मातेच्या स्तुतीसाठी आद्य वाल्मीकी, कालिदास, शंकराचार्य यांनी अनेक रमणीय रचना केल्या आहेत. भ्रर्तृहरीने आपल्या वैराग्य–शतकात 'कदा वाराणस्याम् अमरतटिनी –रोधसि वसन्' अशा श्लोकात 'मला गंगेच्या काठी केव्हा राहायला मिळेल?' अशी व्याकुळ इच्छा प्रकट केली आहे. गंगा यमुना संगमात स्नान केल्याचं पुण्य आपल्याकडे मोठं मानलं जातं. 'म्हणजे त्यायोगे ज्ञानाशिवाय देखील मानवाला मोक्ष प्राप्त होतो' असं कालिदासानं रघुवंशात म्हटलं आहे.



**गोमुख (गंगा नदीचा उगम)**




**गंगोत्री (गंगा नदीचे मंदिर)**

**'गंगा गंगेति यो ब्रूयात योजनानाम् शतैरपि।**
**मुच्यतेसर्व पापेभ्यो विष्णुलोकम् च गच्छति।।'**

शेकडो योजने गंगा आपल्यापासून दूर असली तरी तिच्या केवळ नामस्मरणाने आम्हाला मोक्ष प्राप्त होतो अशी आमची भावना आहे.

दरवर्षी हिंदू धर्मीय प्रजाजन ज्येष्ठ शुद्ध १ ते ज्येष्ठ शुद्ध १० हा दहा दिवसांचा कालावधी गंगा दशहरा सप्ताह म्हणून साजरा करतात. दहा दिवस 'गंगालहरी' हे संस्कृत कवींचा मुकुटमणी जगन्नाथ पंडित यांनी रचिलेले अत्यंत लोकप्रिय स्तोत्र गायले जाते. या जगन्नाथाचा जीवन प्रवास खूप रोचक आणि उद्बोधक आहे. आंध्रातील वेंगी नाडी गावाच्या पेरुभट्ट आणि लक्ष्मीबाई या तेलंगी ब्राह्मण दांपत्याच्या पोटी इसवीसन १५१५ मध्ये जगन्नाथ यांचा जन्म झाला. जात्याच बुद्धिमान असल्यामुळे लहान वयातच शास्त्र अभ्यास करून जगन्नाथ संस्कृत भाषेचा पंडित झाला. त्याचे लग्नही पूर्वीच्या प्रथेप्रमाणे लहानपणीच झाले. पत्नीचे नाव होते 'भामिनी'. ही रसिक आणि विदुषी होती, पण तिचे फारच लवकर निधन झाले. तिच्या स्मरणार्थ जगन्नाथाने 'भामिनीविलास' हे काव्य लिहिलं. पत्नी निधनानंतर कर्नाटकात आणि महाराष्ट्रात आपल्या विद्वत्तेचं योग्य कौतुक होत नाही असे वाटून तो उत्तरेस गेला. तिथे जयपूरचा राजा भगवानदास यांनी त्याला आश्रय दिला. तेथील वारंवार होणाऱ्या विद्वत् सभा आणि शास्त्रार्थवाद यामध्ये जगन्नाथाने अनेक वेळा आपले प्रभुत्व दाखवले. त्याची कीर्ती अकबर बादशहाच्या कानावर गेली. जयपूर नरेश हा अकबराचा मांडलिक होता आणि त्याची बहीण भानुमती ही अकबराची पत्नी होती. अकबराला धार्मिक वादांची आवड होती आणि आपल्या पदरच्या काझींशी वाद करण्यासाठी त्याने जगन्नाथास बोलवलं. दिल्ली दरबारात हा वाद झाला आणि जगन्नाथाने काझींचा पूर्ण पराभव केला.



त्यावेळी अकबराने वस्त्र, अलंकार आणि 'पंडितराय' ही पदवी देऊन जगन्नाथाचा बहुमान केला. जगन्नाथाला अकबराने आपल्या दरबारी ठेवले आणि जगन्नाथाच्या विद्वत्तेला असा योग्य राजाश्रय मिळाला. पुढे अकबाराने राणी भानुमती पासून झालेली मुलगी म्हणजे भामिनीला (जिला सर्वजण 'लवंगी' असे म्हणत) संस्कृत शिकवण्याच्या कामावर जगन्नाथाची नेमणूक केली. या शिक्षणादरम्यान या शिष्येवर गुरूचे प्रेम बसले. आपल्या उत्स्फूर्त काव्याने अकबरास प्रसन्न करून एक दिवस संधी साधून जगन्नाथानी त्याच्याकडे लवंगीची मागणी केली. विद्वान जगन्नाथाची ही मागणी पूर्ण करत अकबराने लवंगीचा विवाह जगन्नाथाशी करून दिला. पुढे अकबर वारल्यावर जहांगीर आणि नंतर शहाजहान यांच्या दरबारी पण जगन्नाथास आश्रय होता. परंतु हिंदू धर्मातील पुराणमतवादी लोकांनी एका यवनीशी लग्न केल्याबद्दल जगन्नाथ आणि लवंगी यांचा फार छळ केला. या छळाला कंटाळून

काशीच्या आत्मवीरेश्वराच्या घाटावर (यालाच जगन्नाथाचा घाट म्हणतात) जगन्नाथ आणि लवंगी यांनी गंगा मातेची भक्तिभावाने आळवणी केली. जगन्नाथाच्या अद्वितीय काव्य प्रतिभेचा उत्तुंग आविष्कार 'गंगा लहरी' या अप्रतिम काव्यातून साकार झाला. जगन्नाथ आणि लवंगी बसलेल्या घाटाला ५२ पायऱ्या आहेत. जगन्नाथाच्या एकेका श्लोकाबरोबर गंगेचे पाणी एकेक पायरी वर चढत होते. शेवटच्या ५२ व्या श्लोकानंतर गंगामाईने जगन्नाथ आणि लवंगी यांना आपल्या स्पर्शाने पावन करून सदेह आपल्या पोटात घेतले. या चमत्कारावरून त्यांच्या पावित्र्याविषयी पुराणमतवाद्यांची खात्री पटली. त्यांना पश्चात्ताप झाला. पण तेव्हा फार उशीर झाला होता. ही अशी जगन्नाथाच्या आयुष्याची कथा सांगितली जाते.

जगन्नाथाचे 'गंगालहरी' (याला 'पियुषलहरी' असेही म्हणतात) हे अत्यंत पदलालित्य मंडित आणि मधुर काव्य आहे. जगन्नाथाने या स्तोत्राची रचना 'शिखरणी वृत्त' या त्याच्या आवडत्या वृत्तात केली आहे. यातील एक विशेष म्हणजे ओळीतल्या पाच व सहा आणि पुढे बारा आणि तेरा या अक्षरांत समान ध्वनी पदे योजत त्याने अनुप्रासात लयबद्धता आणली आहे. आणखी काही सौंदर्यपूर्ण वैशिष्टे आढळतात. दुसऱ्या श्लोकात 'द' पदाचं आवर्तन नादमय वाटत राहतं.

दरिद्राणां दैन्यं दुरितमथ दुर्वासनहृदां
द्रुतं दूरीकुर्वन्सकृदपि गतो दृष्टिसरणिम्।
अपि द्रागाविद्याद्रुमदलनदीक्षागुरुरिह
प्रवाहस्ते वारां श्रियमयमपारां दिशतु नः।।२।।

१८ व्या श्लोकात 'धान' पदाची लयबद्धता दिसते ....

निधानं धर्माणां किमपि च विधानं नवमुदां
प्रधानं तीर्थानाममलपरिधानं त्रिजगतः।
समाधानं बुद्धेरथ खलु तिरोधानमधियां
श्रियामाधानं नः परिहरतु तापं तव वपुः।।१८।।

.. तर विसाव्या श्लोकात 'ल' पदाचं लालित्य मोहून टाकतं.

मरुल्लीलालोलल्लहरिलुलिताम्भोजपटली–
स्खलत्पांसुव्रातच्छुरणविसरत्कौङ्कुमरुचि।
सुरस्त्रीवक्षोजक्षरदगरुजम्बालजटिलं
जलं ते जम्बालं मम जननजालं जरयतु।।२०।।


कालिदासाच्या मेघदूता इतकेच रसभरित 'गंगा लहरी' काव्य हा भारतीय प्रतिभाशक्तीचा अत्युच्च आविष्कार वाटत राहतो.

काही भाग्ययोग आपल्या आयुष्यात परमेश्वर कृपेने येतात. २०२२ मध्ये गंगोत्रीला जाण्याचा योग आला. त्यावेळी गंगा नदीकिनारी गंगोत्री मंदिर परिसरात पंडितराज जगन्नाथ यांचे 'गंगा लहरी' स्तोत्र (पूर्ण ५२ संस्कृत श्लोक) चाल लावून म्हणायची संधी मला मिळाली.

।। श्री गंगार्पणमस्तु ।।

**– डॉ. कीर्ती आगाशे**
विभाग प्रमुख – इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स
विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन
ठाणे

●●●



# ‘देरसू उझाला’ या पुस्तकाच्या अनुवादाची कहाणी आणि चित्रपटाचे परीक्षण..

*‘डेरसू उझाला’ हा १९७५ चा सोव्हिएत-जपानी चरित्रात्मक साहसी नाटक चित्रपट आहे जो अकिरा कुरोसावा यांनी दिग्दर्शित केलेला आणि सह-लेखन केलेला आहे, हा त्यांचा एकमेव गैर-जपानी-भाषेतील चित्रपट आणि त्यांचा एकमेव ७०mm चित्रपट आहे. हा चित्रपट रशियन संशोधक व्लादिमीर अर्सेनेव्ह यांच्या १९२३ च्या देरसू उझाला या संस्मरणावर आधारित आहे. ‘देरसू उझाला’ या पुस्तकाच्या अनुवादाची, तसेच अकिरा कुरुसावा यांनी त्यावरील आधारित केलेल्या चित्रपटाच्या संदर्भातील ज्येष्ठ अनुवादक जयंत कुलकर्णी यांचा लेख - संपादक*

जे जंगलात हिंडतात, ट्रेकींग करतात, त्यांना भावणारा हा सिनेमा. मलातरी हा बघितल्यावर रात्रभर झोप आली नाही.

देरसूची शप्पत !

दोन गोष्टी नेहमी माझ्या हाताशी असतात.

‘पाडस’ नावाचे पुस्तक आणि देरसू उझालाची सी.डी.

हा चित्रपट पाहून या पुस्तकाचा अनुवाद मी करायला घेतला त्यावेळी मी अमेरिकेत होतो. मी अगदी झपाटून त्याचा अनुवाद केला. पहाटे देरसू, सकाळी देरसू, दुपारी देरसू, संध्याकाळी देरसू आणि रात्रीही देरसू. माझ्या मुलीने माझी बसण्याची, लिहिण्याची मस्त सोय केली होती. मध्ये मध्ये इथोपियन कॉफीही मिळत होती. मग काय! हे पुस्तक मी तीन महिन्यांत संपवले आणि मला यासाठी महाराष्ट्र राज्याचा सर्वोत्कृष्ट अनुवादाचा पुरस्कारही मिळाला.



देरसू उझाला : माक्झीम मंझूक

**देरसू उझाला**

एका ओबड-धोबड मातीच्या थडग्यापाशी कपितान मान खाली घालून उभा आहे. ज्याने आपला प्राण वाचवला आहे अशा मित्राचा मृत्यू बघणे यासारखी क्लेषकारक घटना या जगात असेल असे मला वाटत नाही. थडग्याच्या डोक्याच्या बाजूला सैनिकांच्या थडग्यावर जशी त्याची रायफल उभी करतात तशी एक काठी रोवून उभी केली आहे. ही काठी आपण कधीच विसरू शकत नाही. आजूबाजूला जंगलातल्या उंच झाडांच्या बुंध्यांच्या सावल्या वातावरण इतके गंभीर करतंय की ते आपल्या अंगावर येतंय. तेवढ्यात त्याची हृदय पिळवटून टाकणारी हाक अस्पष्टशी बाहेर पडते - देरसू.

पुढच्याच क्षणी पडद्यावर जंगलाच्या पार्श्वभूमीवर, ते थडगं, काठी आणि जंगल दिसते आणि आपल्या नजरेसमोरून गेल्या दोन तासांचा चित्रपट उलगडत जातो. मन खिन्न, उदास होतं. जणू काही आपला जवळचा आप्त किंवा मित्रच गेला आहे,

परत कधीही न भेटण्यासाठी. मागच्या दोन तासांत दहा वर्षांची सोबत देणारा कोण हा? आणि काय त्याचे आणि आपले नाते? आता ज्या माणसाचे या पृथ्वीशीच जवळचे नाते आहे त्याचे आणि आपले नाते काय असणार? तुम्हीच सांगा ! त्याचे नाव 'देरसू उझाला' आणि ज्या सिनेमातल्या चित्राच्या वर्णनाने या परीक्षणाची सुरवात केली आहे त्या सिनेमाचे नावही तेच 'देरसू उझाला.'

१९०२ साली एक रशियन सैन्यातला सर्वेअर आणि त्याची प्लाटून चीन आणि रशियाच्या सरहद्दीवर युसोरी नदीच्या बाजूच्या प्रदेशाचे नकाशे काढायच्या मोहिमेवर निघाले होते. त्या काळात प्रत्यक्ष जागेवर जाऊनच हे नकाशे काढायला लागत. कारण त्यावेळी ना सॅटेलाईट होते ना आधुनिक सर्वेची यंत्रसामग्री. त्यासाठी जी अग्नीदिव्ये त्यांना पार करायला लागत, त्याची आपण या काळात कल्पनाच नाही करू शकणार. त्या लोकांचे आपल्यावर अनंत उपकार आहेत. त्याचे नाव होते– 'व्लादिमीर अर्सेनिव'.




पुस्तकाचे मुखपृष्ठ

असेच एकदा जंगलात पुढे जायला वाटच नसल्यामुळे त्यांचा मुक्काम दाट झाडीत पडतो. सगळीकडे झाडे उन्मळून पडलेली असतात. वातावरण गूढ, काळोख, रातकिड्यांच्या आवाजाने भारून गेलेले असते. याचा अनुभव ज्यांनी ट्रेकींग करताना रात्री जंगलात मुक्काम ठोकला आहे त्यांना आला असेल. अशावेळी मनात नको नको ते विचार येतात. भूतकाळ मनातून पापण्यांच्या आड उतरतो. परमेश्वराचे अस्तित्त्व आहे का नाही असे भलतेसलते विचार मनात यायला लागतात. डोळे मिटताएत तोच दगड गडगडल्याचा आवाज कानावर येतो. तो ऐकताच सर्वजण आपापल्या बंदुका सावरत, सरसावत उठतात. एकजण म्हणतो सुद्धा 'अस्वलच असणार! तयार रहा!' सगळे आपल्या रायफल्स बोल्ट करतात तेवढ्यात एका माणसाचा आवाज ऐकू येतो–

Please to not shoot ! Me are people

या वाक्यात विशेष काय आहे? पण हे वाक्य ज्या स्वरात म्हटले गेले आहे त्यातला साधेपणा आणि प्रामाणिकपणा आपल्या हृदयाला स्पर्श करून गेल्याशिवाय राहात नाही. त्या स्वरातला, आवाजातला हा गुण आपल्या कायमचा लक्षात रहातो. मग आपल्याला देरसूचे पहिले दर्शन होते. मी जेव्हा देरसुला पहिल्यांदा बघितले तेव्हा तो मला एका श्वापदासारखा भासला. दुसऱ्यांदा बघितले तेव्हा तो मला एखाद्या शिकाऱ्यासारखा भासला आणि आता जेव्हा जेव्हा मी हा सिनेमा परत परत बघतो किंवा दाखवतो तेव्हा तेव्हा तो मला एखाद्या जंगलाच्या देवतेसमान भासतो. माणूस तोच; पण आपण मात्र हा सिनेमा बघितल्यावर तेच राहात नाही हेच खरं!

देरसूच्या भूमिकेत मंझुकने कमाल केली आहे. अकिराला (माझा अत्यंत आवडता दिग्दर्शक) जेव्हा हा सिनेमा दिग्दर्शित करण्यासाठी तात्कालिन रशियन सरकारकडून बोलावण्यात आले, तेव्हा या भूमिकेसाठी

योग्य अशा नटाचा शोध घेणे हे त्याच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचे होते. देरसूच हा सिनेमा तारून नेणार होता. सतत दोन वर्षे अथक प्रयत्न केल्यावर – प्रयत्न म्हणजे काय, तर सगळ्यांना घेऊन रोज मंगोलियन व रशियन चित्रपट बघायचे आणि त्यात एखादा पटेल असा नट दिसतो का ते बघायचे. एके दिवशी त्याला एका सुमार मंगोलियन चित्रपटात एका छोट्याशा भूमिकेत मंझूक सापडला. त्याला ताबडतोब बोलावून घेण्यात आले. अकिराने बोलावले आहे म्हणजे नाही म्हणायचा प्रश्नच नव्हता. त्याकाळात चित्रपट जगतात अकिराचा प्रचंड दबदबा होता. अकिराने त्याची मुलाखत एका बंद खोलीत घेतली. २/३ झाले, बंद खोलीचे दार काही उघडले नाही, बाहेर सगळे वाट बघत होते. कारण देरसू सापडल्यावर चित्रिकरण सुरू होणार होते. न राहवून त्याच्या एका मदतनिसाने खोलीचे दार किलकिले करून आत डोकावले तर बुटका मंझूक खुर्चीत बसला होता आणि अकिरा त्याच्या समोर उभा राहून त्याच्याशी बोलता होता. हे बघून तो उडालाच! कारण अकिराच्या समोर बसायचे धाडस त्या काळी कोणातही नव्हते.


अकिरा कुरोसावा

मंझूक !

पण आपला मंझूकसुद्धा तेवढ्याच ताकदीचा कलाकार होता. त्या चित्रपटाच्या चित्रिकरणाच्या दरम्यान अकिराला मंझूकला एकदाही अभिनयाच्या सूचना द्याव्या लागल्या नाहीत. मंझूकचे नाव त्याच्या प्रदेशात तेवढेच महत्त्वाचे होते (तुवान). कलाक्षेत्रात काय केले नव्हते त्याने ? लेखन, नाटक, कविता, चित्रकला, रेडिओ, चित्रपट, गाणे, वादन असे एकही क्षेत्र नव्हते ज्यात त्याने आपला ठसा उमटवला नव्हता.

अकिराचा सगळ्यात आवडता हा नट १९९९ साली स्वर्गवासी झाला. त्यावेळी त्याचे वय ८९ होते. एकच वर्षाने अकिरा गेला तेव्हा त्याचे वय ९० होते. त्या दोघांची मैत्री मृत्यूनेच सोडवली असे म्हणायला हवे.

'देरसू उझाला' ही पण दोन मित्रांची गोष्ट म्हणता येईल. अर्सिनेवने या पहिल्या भेटीनंतर देरसूला त्या घनदाट जंगलात वाटाड्या म्हणून चालण्याची विनंती केली आणि दोघांनीही ती दोस्ती शेवटपर्यंत निभावली. त्यांच्या त्या मैत्रीच्या प्रवासाची ही गोष्ट आहे.

आता हा पहिल्या भेटीतलाच प्रसंग पहा ना. शेकोटीतली लाकडे आवाज करत असतात तर हा त्या लाकडांच्या अंगावर ओरडून गप्प व्हायला सांगतो. 'काय पिरपिर चालवलीये मगापासून' देरसूचे माग काढायचे कसब अजबच असते. जंगलात आयुष्य गेल्यामुळे त्याच्या रक्तातच ते जंगल भिनलेले असते. इतर प्राण्यांसारखेच त्याला वास व चाहूल लागते. त्या माग काढायच्या कसबाचे २/३ प्रसंग लक्षात रहाण्यासारखेच आहेत.

युरी सोलोमीन या नटाने पण अर्सिनेवचे काम उत्कृष्ट केले आहे. लेखकाने जे काही लिहिले आहे त्याला तर तोडच नाही. उदा. ते असेच एकदा चाललेले असताना, देरसू अर्सिनीवच्या सैनिकांना म्हणतो, 'तुम्ही

या जंगलात बाळं आहात. नाही शिकलात तर नाहक मराल या जंगलात.'

अर्सिनेवला देरसूची खरी महती पटते ती अशाच एका प्रसंगात. त्यांना वाटेत एक झोपडीसदृश आसरा लागतो, तर देरसू ती झोपडी दुरुस्त करतो आणि अर्सिनेवला थोडे तांदूळ मागतो. अर्सिनेवला ते त्याला कशाला मागतोय ते कळत नाही. विचारल्यावर देरसू त्याला सांगतो ''या जंगलात चुकलेले वाटसरू येतील, त्यांना उपयोगी पडतील.'' अर्सिनेवला हे उत्तर अपेक्षितच नव्हते. इथे जे कोण येणार आहेत, आणि जे त्याला पुढे कधीही भेटायची शक्यता नव्हती अशा माणसांची देरसू काळजी करत होता!

देरसूनी त्याच्या भाषेत आणि विचाराने जंगलाचा कायदा आणि आयुष्याच्या कल्पना फार सोप्या करून टाकल्या होत्या. जंगलातल्या सर्व गोष्टींना त्याने मनुष्यत्व बहाल केले होते. हा सूर्य एक माणूस, हा चंद्र एक माणूस, प्राणी माणसे, उंदीर माणसे, एवढंच काय, वारा, पाऊस, आग ही सर्व माणसेच.

आणि साधेपणातरी किती असावा माणसात? याचेच एक उदाहरण अकिराने फार छान चित्रित केलंय. हे सगळे सैनिक रस्त्यात एका दोरीला एक बाटली बांधून नेमबाजीचा सराव किंवा गम्मत समजा, करत असतात. देरसू त्यांना म्हणतो 'अरे बाबांनो, या जंगलात बाटली मिळायची मुष्कील, कशाला ती बाटली फोडताय?' खेळ असा असतो, झोका दिलेल्या बाटलीला गोळी मारायची. सगळ्यांचे नेम चुकतात. शेवटी एक जण देरसूला हेटाळणीने म्हणतो, 'काय करायचाय का तुला प्रयत्न?' देरसू त्यांना अगदी भोळेपणाने सांगतो 'मी त्या बाटलीला नाही गोळी मारणार. फुटेल ना ती! मी त्या दोरीला मारतो, पण ती बाटली मात्र मला द्यायची.' आणि तो ती बाटली जिंकतो! त्यावेळी सगळयांचे चेहेरे पहाण्यासारखे होतात आणि व्लादिमीरच्या चेहऱ्यावरील हास्य...

अशाच एका रात्रीच्या मुक्कामात देरसू, त्याचे कुटुंब देवीच्या साथीत कसे मरते आणि ते सगळे घरदार त्याला कसे जाळून टाकायला लागते याची हृदयद्रावक कहाणी सांगतो. त्या वेळेचे मंझूकच्या चेहऱ्यावरचे भाव आणि अभिनय मी तरी विसरू शकणार नाही आणि त्या वेळेची गूढ वातावरण निर्मिती ही अकिराची करामत. एक आता सांगायला हरकत नाही; या चित्रपटातील प्रत्येक फ्रेम ही एक उत्कृष्ट छायाचित्र आहे आणि ज्यांना कंपोझिशन शिकायचे आहे त्यांनी हा चित्रपट त्या दृष्टीकोनातून जरूर बघावा.

देरसूला नैसर्गिक संकटांची चाहूल जनावरांसारखीच लागते. अशाच एका बर्फाच्या वादळात तो अर्सिनेवचा प्राण कसा वाचवतो हे मी सांगत नाही. बघायलाच पाहिजे किंवा वाचायला पाहिजे. या पहिल्या प्रवासाच्या शेवटी जेव्हा त्यांचे मार्ग वेगळे होणार असतात, तेव्हा देरसू त्याच्या दोस्ताला म्हणजे अर्सिनेवला बंदूकीच्या गोळ्या मागतो त्या वेळी त्याच्या मनाची होत असलेली घालमेल नुसती चेहऱ्यावरून आणि स्तब्ध राहून मंझूकने कमाल केली आहे. न बोलता, स्तब्ध राहूनही अभिनय करता येतो, आणि आपल्यापर्यंत त्याच्या मनातले भाव पोहोचवता येतात, हे मलातरी प्रथमच कळले!

त्यांचा निरोप सभारंभही ऐकण्यासारखा आहे. आपल्याला वाटते हा चित्रपट संपला इथे. पण हा चित्रपट असे काही वळण घेतो की, आपल्याला रात्री झोप येणे मुष्कील!

अर्सिनेवची आणि देरसूची पुनर्भेट १९०७ च्या हिवाळ्यात होते. बर्फाच्या नद्या तुटायला लागलेल्या असतात, त्या काळात.

अर्सिनेव देरसूची भेट सुद्धा अनभुवण्यासारखी आहे. देरसूला जंगलातल्या जनावरांचे वागणे समजू शकत होते. पण माणसांचे वागणे समजणे त्याच्या आवाक्याबाहेरचे होते. पण आता देरसूचे वय झालेले असते. ते कोणीही थांबवू शकत नाही. त्यानंतर अशा घटना घडायला लागतात की, त्याची म्हातारपणाची भीती ही वेगळ्या स्वरूपात त्याच्या मनाचा कब्जा घेते. वाघाला अंबा – त्याच्या भाषेत, गोल्डीच्या जमातीत जंगलाचा आत्मा मानतात आणि जंगलाचा देव, त्याचे नाव 'कांगा' त्याला शेवटी भास व्हायला लागतात की, कांगा त्याला मारायला अंबाला पाठवतोय आणि आत त्याला दिसत नसल्यामुळे तो मरणार आहे. विशेषत: त्याला जेव्हा नेम घेण्याइतकेही दिसत नाही तेव्हा मात्र तो कोसळतोच.

म्हातारपणी जेव्हा पलीकडचा काठ दिसायला लागतो, त्यावेळी होणारी जीवाची घालमेल कशी असते ते सांगता येणार नाही. देरसूला त्या जगात कोणी नव्हते. आता कधीतरी नातवंडांना सोडून जावे लागणार या कल्पनेनेच माझ्या डोळ्यांत पाणी येते.

शेवटी जंगलात ज्याने आपले प्राण अनेकदा वाचवले, त्या मित्राची दोस्ती निभवण्यासाठी अर्सिनेव आपल्या या म्हाताऱ्या मित्राला स्वत:च्या घरी घेऊन जातो. तिथे त्याच्या मुलाशी देरसूची गट्टी जमते. एकदा अर्सिनेव आपल्या मुलाला विचारतो, 'काय रे देरसू तुला जंगलातल्या गमती जमती सांगतो का नाही?'

'हो, सांगतो ना!'

'एवढेच नाही, त्याने तुझ्या वडिलांचे प्राण अनेकदा वाचवले आहेत हे माहिती आहे का तुला?'

'नाही. त्या बद्दल तर तो काहीच बोलला नाही.'

'त्याचे त्याला काही विशेष वाटत नाही हाच त्याचा मोठेपणा आहे, अर्सिनेव.'

पण देरसूचे मन त्या शहरात रमत नाही. तो खिन्नपणे दिवस काढत असतो. एक दिवस धीर धरून तो त्याच्या मित्राची, कपितानची जंगलात जाण्यासाठी परवानगी मागतो.

तो प्रसंग पाहाताना आपलेच काळीज कुरतडले जाते.

अर्सिनेव जड अंत:करणाने ती देतो; पण जातांना त्याच्या हातात एक करकरीत नवीन बंदूक ठेवतो. 'देरसू तुला कमी दिसत असले तरी तू या बंदुकीने नेम धरू शकतोस, ही तरी तू बरोबर घेऊन जा!'

शेवटची भेट....

देरसू गेल्यानंतर दोनच दिवसांनी अर्सिनेवला एका मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी पोलिसांची तार येते –

मृतदेहावर आपले कार्ड सापडल्यामुळे आपणास विनंती...

हे लिहिताना सुद्धा त्याचा मृत्यू आठवून माझे मन खिन्न झाले आहे... शहरातल्या लोकांनीच त्याचा घात केलेला असतो...

देरसू उझाला : माक्झीम मंझूक

अर्सिनेव : युरी सोलोमीन. त्याच्या गावाचे co-ordinates Lat 48°28'36.18"N Lon 135°05'39.63"E

दिग्दर्शक : अकिरा कुरोसावा

लेखक : व्लादिमीर अर्सिनेव.

**– जयंत कुलकर्णी**
ज्येष्ठ भाषांतरकार व लेखक
पुणे

•••

# दिनविशेष - प्रेरणादायी तेवढाच मार्गदर्शकही !

*वर्षातील प्रत्येक दिवस स्वत:ची तारीख आणि वार घेऊनच उजाडतो, तीच असते त्याची ओळख. सण, कुटुंब, इतिहास, राष्ट्र यांच्या संदर्भात काही दिवस विशेष महत्त्वाचे ठरतात. ते महत्त्व जपण्यासोबतच पुढील पिढीकडे त्याचा वारसा शतकानुशतके येत राहिला. अलीकडच्या काळात मात्र 'विशेष दिनांसाठी' वर्ष कमी पडू लागले. वसुंधरादिनापासून ते मातृदिन, पितृदिन, मैत्रीदिन, परिचारिका दिन, ओझोन दिन, सायकल दिन, चिमणी दिन... अंतहीन यादी. व्हॉटस ॲप विद्यापीठ आणि वृत्तपत्रांतून त्या 'विशेष दिनाचा' साक्षात्कार, काही संबंधितांना त्या दिनाचा शुभेच्छा संदेश, पुढच्या क्षणी विसर! संपूर्ण मानवजातीसाठी विशेष ठरलेल्या विशेष दिनांचेही विस्मरण निश्चितच अस्वस्थ करणारे आहे. केवळ घटनेची आठवण नव्हे तर कर्तृत्व, प्रेरणा आणि त्यातून युवा पिढीने घ्यायचे धडे यासाठीच '२० जुलै'चे हे संस्मरण! - संपादक*

२० जुलै १९६९ - त्याकाळी ज्या देशांमध्ये टी.व्ही. होते तेथील समस्त जन टी.व्ही. समोर आणि टी.व्ही. नसलेल्या देशांतील बहुसंख्य मंडळी रेडिओला खिळून राहिलेली, ''आवश्यक कौशल्ये असलेल्या अनेक व्यक्तींनी योग्य नेतृत्वासोबत एकत्रितपणे आणि प्रखर जिद्दीने कार्य केले तर 'चमत्कार' घडू शकतो'' या उक्तीचा संपूर्ण मानवजातीला प्रत्यय देणारा, अनंत समस्या आणि पदोपदी मृत्यूला हुलकावणीच्या खेळाची आठ वर्षांची जीवघेणी कठोर तपश्चर्या, जिद्द, झपाटलेपण. अशा अनेक गोष्टींचा थरार प्रत्येक मनाला भिडवलेला, आणि आत्मप्रौढीचा लवलेशही नसलेले 'येथे उमटलेले हे छोटे मानवी पाऊल, पण मानव जातीची मोठी झेप' हे चांद्रभूमीवर उच्चारले गेलेले पहिले शब्द पृथ्वीवरच्या मानवांनी ऐकले तो थरारक दिवस! कोलंबिया यानापासून ईगल चांद्रकुपी अलग झाली, काही हजार वैज्ञानिक, अभियंते, उद्योजक, विद्यापीठे यांची ८-१० वर्षांची तपश्चर्या आणि अत्यंत कठोर खडतर प्रशिक्षणाचे पाठबळ सोबत घेऊन आलेल्या नील आर्मस्ट्राँग आणि बझ ऑल्ड्रिन यांना घेऊन त्या कुपीचा शेवटच्या ७० मैलांचा प्रवासथरार, त्यावेळी अत्यंत चिंताग्रस्त स्थितीत चंद्राभोवतीच्या आकाशात प्रदक्षिणा घालत राहिलेला मायकेल कॉलिन्स, काही क्षणात अलगद चंद्र भूमीवर उतरलेले. ईगल यान, शिडीवरून खाली उतरून चंद्रावर पहिले मानवी पाऊल ठेवणारा आर्मस्ट्राँग, त्यामागोमाग ऑल्ड्रिन, तेथील मातीवर उमटलेले बुटांचे ठसे आणि अमेरिकन राष्ट्रध्वज तेथे रोवून ऑल्ड्रिनने केलेला सॅल्यूट... जगभरच्या कोटी कोटी मनांनी त्याक्षणी मनापासून मानाचा आणि कौतुकाचा मुजरा केला मानवी कर्तृत्वाला! मानवाच्या पृथ्वी ते चंद्र आणि तेथून परत, या यशस्वी मोहिमेतील हा दिवस जितका ऐतिहासिक तितकाच विज्ञान आणि वैज्ञानिक कर्तृत्वे यांचे जगाला डोळे दिपविणारे दर्शन देणारा होता. अपोलो ११, २० जुलै १९६९, नील आर्मस्ट्राँग हे तेव्हापासून मानवी इतिहासात आगळे महत्त्व असलेले शब्द बनले. त्यांच्या जोडीने तेवढीच किंवा काकणभर अधिकच प्रतिष्ठा लाभली जॉन एफ् केनेडी या नावाला! अत्यंत देदिप्यमान अशा या यशाचे प्रेरणास्थान होते जॉन केनेडी.

१२ एप्रिल १९६१ या दिवशी वोस्तोक १ या यानातून अति दूरच्या अवकाशातून युरी गागारीनने १०८ मिनिटात पृथ्वी प्रदक्षिणा केली, बाह्य अवकाशात प्रवास करणारा तो पहिला मानव ठरला. रशियाच्या या कर्तृत्वाने अस्वस्थ अमेरिकन माध्यमांच्या टीका आणि धोरणांसंबंधी चौकशांची झोड! त्यावर केवळ महिन्याभरात, २५ मे

१९६१ या दिवशी अमेरिकन काँग्रेस अधिवेशनात अचानकपणे राष्ट्राध्यक्ष केनेडींनी केली धक्कादायक घोषणा – ''चंद्राच्या भूमीवर उमटणारा मानवी पावलाचा पहिला ठसा अमेरिकन अवकाशवीराचाच असेल! मानवाला चंद्रावर उतरविणे आणि तेथून सुखरूप पृथ्वीवर परत आणणे ही राष्ट्राची प्रमुख मोहीम असेल, हे दशक संपण्यापूर्वी आम्ही त्यात यश मिळवू!'' चंद्रावर पोहोचण्यासाठी लागणारी साधने, रॉकेटस्, प्रक्षेपण यंत्रणा, प्रवासातील धोके, गरजा आणि प्रवासमार्ग, अवकाशयात्रींचे पोशाख, शून्य गुरुत्वाकर्षणातील जीवन अशा असंख्य बाबतींत काहीही माहिती नसताना, खरे तर त्यासाठी काय करावे लागेल याची कल्पनाही नसताना राष्ट्राला दिलेले हे वचन! – केवळ आठ वर्षे, एक महिना आणि २५ दिवसात या वचनाने संपूर्ण राष्ट्रात केवढा कायापालट घडवून आणला त्याचे मोजमाप अशक्यच. एका व्यक्तीचे स्वप्न न राहता त्याचे अत्यंत आव्हानात्मक वचन संपूर्ण राष्ट्राला किती आणि कसे झपाटून टाकते याचे हे उदाहरण सूज्ञांनी व युवकांनी लक्षात घ्यावे. असे अनेक पथदर्शी महत्त्वाचे पैलू या उदाहरणात मिळतात. अनेकांच्या विस्मरणात गेलेल्या या देदिप्यमान घटनेच्या ५५ वर्षांनंतरही ते तेवढेच, खरे तर अधिक महत्त्वाचे आहेत याचे भान यायला हवे. एकूणच अपोलो उपक्रमावर दृष्टीक्षेप टाकला तर काही बाबी ठळकपणे जाणवतात.

- ''अवकाश संशोधनाचा हा खर्चिक सोस करायचा कशासाठी? चंद्रावरचे दगड धोंडे आणि माती आणण्यासाठी?'' हा प्रश्न केनेडींच्या काळापासून आजही अनेक ठिकाणी उपस्थित होत राहिला आहे, १९६३ साली केनेडींची हत्या झाली तरी नासाचे कार्य तेवढ्याच कणखरपणे अव्याहत सुरू आहे.

- कारण कोणतेही असो, राष्ट्राने निश्चित केलेल्या ध्येयासाठी प्रत्येकाने वृत्ती, गती आणि आवश्यक ते सगळे स्वीकारून झपाटलेपणाने स्वत:ला पूर्णत: त्यात झोकून देण्याची तयारी. त्यासाठीचे नियोजन कौशल्य, हजारो विविध कार्ये आणि गरजां मधील समन्वय, सुसूत्रता आणि कामांचा झपाटा! जसे, केनेडींनी राष्ट्रास वचन दिले २५ मे १९६१ या दिवशी; अशा अवकाश प्रवासासाठी उपयुक्त विविध संवेदक, गायरोस्कोप्स, डिजिटल कॉम्प्युटर्स जगाला साधी ओळखही नसलेली इंटिग्रेडेट सर्किटस् इत्यादींच्या विकासासाठी एम्.आय.टी. संस्थेच्या ड्रेपर प्रयोगशाळेला कॉन्ट्रॅक्ट – ९ ऑगस्ट १९६१! हे कॉन्ट्रॅक्ट देताना ''विकसित होणारी उपकरणे आवश्यक कार्ये यशस्वीपणे करतील याची खात्री कशी देणार?'' अपोलो प्रकल्प प्रमुखाच्या या प्रश्नाला प्रयोगशाळा संचालकाचे तत्क्षणी उत्तर – ''त्यासाठी अवकाशयात्रींसोबत यानामध्ये मी स्वत: जाण्यास तयार आहे''!

- एकाच वेळी असंख्य वेगवेगळी कामे अत्यंत सुनियोजित आणि समन्वयातून किती झपाटलेपणी सुरू होती याची किती उदाहरणे शोधायची? ३१ ऑक्टोबर १९६२ या दिवशी रॉकेट जुळणीसाठी ५२५ फूट उंचीची आठ एकरावरील इमारत, प्रक्षेपणकेंद्र यांच्या निर्मितीचा प्रारंभही झाला होता, तेथपर्यंत पोहोचण्यासाठी रस्ता–निर्मितीसाठी संत्राबागा व अन्य वृक्ष तोडून परिसर खुला झाला होता, त्या दिवशी जगातील आजवरचे सर्वांत शक्तीशाली महाकाय सॅटर्न V या रॉकेटचे पहिले इंजिन परीक्षणासाठी दाखलही झाले होते. अत्यंत वेगवेगळ्या क्षेत्रांमधील कामांचे असे नियोजन – त्यापैकी कोणतेही काम आठ–पंधरा दिवसात होणारे नाही, मोजक्या चार–दोन जणांकडून होणारे नाही! द्रष्टेपणा, दूरदृष्टी, कल्पनातील घौडदौड आणि विज्ञान व्यवस्थापनाचे आदर्श नमुनेच.

- अपोलो प्रकल्पकाळात आवश्यक कुशल मनुष्यबळनिर्मितीसाठी शिक्षणसंस्थांना दिलेले प्रचंड आर्थिक पाठबळ, संशोधनास चालना, हजारो विविध उद्योगांचा सहभाग आणि योगदान. शेकडो विविध अपयशे

पचवून प्रत्येक अपयशातून शिकून समस्येवर मात करण्याची अफाट जिद्द. जसे, अपोलो १ च्या परीक्षण प्रसंगी तीन अवकाश यात्रींसह यान आगीने भस्मसात! अपोलो २ आणि ३ (२७ जाने. ६७) ही नावे अस्तित्वात आलीच नाहीत, पण ९ नोव्हेंबर १९६७ला पुढील सगळ्या मोहिमांसाठी विकसित केलेल्या सॅटर्न V रॉकेटचे पहिले चाचणी उड्डाण पूर्ण.

● एकूणच प्रकल्पघोषणा, आखणी, नियोजन आणि कार्यवाही यामध्ये सर्वांत महत्त्वाचा ठरलेला, प्रकल्प प्रमुखांनीही उघडपणे मान्य केलेला मुद्दा म्हणजे संपूर्ण आव्हानासाठी जॉन केनेडींनी प्रारंभीच निश्चित केलेली 'डेड लाईन'. ''दशक अखेरीआधी हे करणारच!'' पर्यायाने प्रत्येक संबंधित कामाच्या पूर्तीसाठी आलेल्या, कठोरपणे अंमलात आलेल्या कालमर्यादा; ''अंत्यबिंदू निश्चित न केलेले उपक्रम हे कायम उपक्रम रूपातच राहतात'' हे अपोलो आस्थापनाप्रमुख जीम ब्रायन्डेस्टाईन यांचे वाक्य केनेडींच्या दूरदृष्टीचे आणि यशामागील मोठ्या रहस्याचे दर्शक आहे.

● अशा आव्हानांसाठी विकसित होणारे तंत्रज्ञान, उद्योग केवळ त्या मोहिमेसाठी न राहता अन्य असंख्य क्षेत्रांमध्ये त्यांचे उपयोजन, उद्योगांसाठी खुली होणारी नवी दालने, संशोधन आणि उद्योजकतेला मिळणारी प्रेरणा. अमेरिकेतील अत्यंत वेगवान रहदारीत चालकाविना चालणाऱ्या टेस्ला मोटारी, स्मार्ट फोन, अनेक प्रकारची इंटिग्रेटेड सर्किट्स, ठरावीक वेळी घराची जमीन स्वच्छ करणारे आणि पुन्हा ठरावीक ठिकाणी जाऊन स्वत:ला रिचार्ज करून घेणारे पूर्णत: स्वयंचलित व्हॅक्यूम क्लिनर्स ही केवळ काही उदाहरणे. हा विकास-पैलू नक्कीच दुर्लक्षित करण्यासारखा नाही.

● एकूणच प्रकल्प आखणीतील वैज्ञानिक दूरदृष्टीचा पैलू विशेष लक्षात घेण्याजोगा आहे. अपोलो ११(१९६७) ते अपोलो १७(१९७२) या मोहिमांमधून ८४२ पौंड (सुमारे ३८५ कि.ग्रॅ.) वजनाचे चांद्रखडक, माती, धूळ यांचे नमुने पृथ्वीवर आणले गेले. हे नमुने आल्यावर ५० वर्षांनंतरही त्यातील बहुतांश भाग स्टेनलेस स्टीलच्या, शुद्ध नायट्राजनने भरलेल्या बंदिस्त पेट्यांमध्ये, मुद्दाम योजनापूर्वक बांधलेल्या चार मजली, मोठ्या बँक लॉकर्ससारख्या सुरक्षित इमारतींमध्ये वर्षाला ४० लाख डॉलर्स खर्च करीत आजवर हेतुत: जाणीवपूर्वक सांभाळणे! कारण? १९६९ साली, किंवा त्या काळात उपलब्ध साधने आणि तंत्रज्ञान यातून त्या नमुन्यांचे होणारे विश्लेषण आणि मिळणारी माहिती मर्यादित राहील. ते जमेल तेवढे करूच, पण भविष्यातील ५०-६० वर्षांनंतर उपलब्ध असणारे तंत्रज्ञान, साधने आणि माहिती खूपच प्रगत झालेली असतील, त्याकाळात उपलब्ध संसाधनांनी विश्लेषण होण्यासाठी पुरेशा प्रमाणात हे नमुने पूर्णत: अबाधित स्वरूपात उपलब्ध झाले पाहिजेत! हा विचार आणि त्यासाठीची योजना हा प्रारंभापासूनचाच आराखडा! वैज्ञानिक दूरदृष्टीचे हे झाले अगदी साधे उदाहरण.

असे आणखी अनेक पैलू शोधता येतील. त्यापैकी प्रत्येक पैलू काही करू इच्छिणाऱ्या राष्ट्रासाठी, तेथील नेतृत्वासाठी आणि युवकांसाठी अतिमोलाचा, मार्गदर्शक ठरणारा आहे हे निश्चित.

संपूर्ण मानवजातीसाठी अभिमानास्पद ठरणाऱ्या या घटनेचा सुवर्ण महोत्सव तेवढ्याच जोशात साजरा झाला नसता तरच नवल. जुलै २०१९ मध्ये संपूर्ण अमेरिकेतील वातावरण अपोलोमय झाले होते. त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमांमध्येही हीच दूरदर्शिता अनुभवायला मिळाली. मोठ्या मिरवणुका, हुल्लडबाजी, डी.जे., नृत्ये कोठेच नव्हती. जागोजागी होते ते ''उद्याचे आर्मस्ट्राँग'', अपोलो मोहिमांमधील अवकाशयात्री, इंजिनिअर्स, तंत्रज्ञ यांचे विद्यार्थ्यांशी संवाद कार्यक्रम, समस्यांवर मात करणाऱ्या यशोगाथा... प्रत्येक कार्यक्रम नव्या पिढीला

प्रेरणा देणारा, हसतखेळत सहभागाचा. स्मिथसोनियन सेंटरमधील अशाच एका कार्यक्रमात 'मायकेल' कॉलिन्सच्या सादरीकरणानंतर (त्यावेळी वय वर्षे ८८) त्यांच्याशी प्रत्यक्ष बोलताना जाणवले ते 'डाऊन टू अर्थ' माणूसपण. स्टेजवरून बोलताना ते सांगत होते, ''आर्मस्ट्राँग आणि ऑल्ड्रिन खाली चांद्रभूमीवर त्यांची कामे करीत होते, त्यावेळी मी ऑर्बिटल मोड्यूल मधून वर चंद्राला प्रदक्षिणा घालत होतो. तुम्ही सारे त्या दोघांच्या आणि देशाच्या कर्तृत्वाचा बेभान आनंद अनुभवत होता. त्यावेळी मी मात्र फार फार प्रदीर्घ वाटलेल्या त्या काही तासांच्या थोड्या वेळात चिंता आणि काळजीने पोखरून निघालो होतो. संपूर्ण अपोलो ११ मोहिमेमध्ये ज्यांच्यासाठी कोणतीही पर्यायी योजना नाही अशा दोनच गोष्टी आहेत. आम्हा तिघांनाही ही माहिती होती, त्याविषयी आम्ही कधीच एकमेकांशी बोललो नव्हतो. त्यापैकी पहिली गोष्ट म्हणजे ऑर्बिटरपासून ईगल वेगळे होऊन त्याच्या चंद्रावर सुरक्षित उतरण्यासाठी असलेली रॉकेटयंत्रणा, आणि दुसरी गोष्ट चंद्रभूमीवरून ईगल यान पुन्हा वर उचलून ते मोड्यूलला जोडण्यासाठीची रॉकेटयोजना. या दोन्हींच्या कामात समस्या आली तर? करण्यासारखे हाती काहीच नाही. एकांडेपणात चंद्राभोवती घिरट्या घालताना धडधड होती ती हीच! जर यान वर आणणाऱ्या रॉकेटने काही गडबड केली तर? दोन्ही सहकाऱ्यांना येथे सोडून माझे एकट्याचे पृथ्वीकडे परतणे हा विचारच जाळून टाकणारा होता.'' हे सांगताना त्यांच्या डोळ्यांतून ओघळलेले अश्रू पूर्ण ऑडिटोरियमने पाहिले. मात्र त्यानंतर काही क्षणांच्या स्तब्धतेनंतर त्यांनी हसत हसत सांगितलेला अनुभव संपूर्ण थिएटरमध्ये मोठा हास्य धबधबा पाडून गेला. ''आम्ही तिघे पृथ्वीवरून निघालो, चंद्रापर्यंत पोहोचलो. दोघे काही काळ चंद्रावर फिरून, आणि मी त्या काळात चांद्रभ्रमणे करून, तिघेही यशस्वीपणे पृथ्वीवर परत आलो. हे फार मोठे कर्तृत्व किंवा यश आहे का? याचे प्रश्नाचे उत्तर पूर्णत: ठरविले पांढऱ्या उंदरांनी! पॅसिफिक सागरातून आम्हाला नौदल सैनिकांनी उचलून घेताच कैद्यांप्रमाणे पुढील २१ दिवस बंद कोठड्यांमध्ये बंदिस्त ठेवले होते– क्वारंटाईनच्या नावाखाली! सोबतीला होते सभोवती हुंदडणारे अनेक पांढरे उंदीर – मुद्दाम आमच्यासोबत ठेवलेले; कोणताही आजार, विकृती न होता सगळे उंदीर सुरक्षित जिवंत राहिले तरच आमची सुटका होणार होती! त्यावेळी यशस्वी अवकाशवीर आणि उंदीर यापैकी अधिक महत्त्वाचे आणि मौल्यवान कोण? या प्रश्नाला माझे उत्तर होते ''अर्थातच् उंदीर!''

अपोलो ११ मोहिमेत कॉलिन्स अत्यंत चिंताग्रस्त अवस्थेत चंद्राभोवती प्रदक्षिणा घालत राहिला, तर अपोलो १७ मोहिमेत (डिसें. ७ ते १९, १९७२) जीन केर्नान आणि हॅरिसन जॅक स्मिटने तीन दिवस आणि काही तास चांद्रभूमीवर, त्या काळात चंद्रावर २२.३ मैल (सुमारे साडेपस्तीस कि.मी.) रोव्हर ड्राईव्ह करणे, वेगवेगळ्या जागांवरील खडक–माती नमुने मिळविणे ही कामे करीत असताना ''त्यावेळी चंद्राभोवती प्रदक्षिणा घालत राहिलेल्या कमांड मोड्यूलचा पायलट रोनाल्ड इव्हान्स मात्र शब्दश: निर्धास्त होता, निश्चिंत डुलक्या घेत होता. त्याच्या घोरण्याचा आवाज ऑन लाईनमध्ये रेकॉर्डही झाला आहे.'' ही आणखी एकाने सांगितलेली आठवण केवळ हसण्यावारी नेण्याची गोष्ट नाही. ही आहे आत्मविश्वासाच्या विकासपातळीची दर्शक!

विस्मृतीत गेलेल्या २० जुलै १९६९ च्या केवळ स्मृतींना वंदन करण्यापेक्षा तो इतिहास आणि त्यातून घेण्याची प्रेरणा आणि धडे यावर शिक्षणसंस्थांमध्ये 'आपण कोठे आहोत' यावर होणारे मंथन युवा पिढीसाठी निश्चितच मोलाचे ठरेल.

**– प्रा. व्यंकटेश गंभीर (निवृत्त वैज्ञानिक)**
होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र,
टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, मुंबई

●●●

# परिसर वार्ता

– संकलित

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

**१ मे २०२४ – सायबर गुन्हे ऑनलाइन कार्यशाळा**

दिनांक १ मे २०२४ रोजी विधी महाविद्यालयाच्या कायदेशीर मदत कक्षाद्वारे 'सायबर गुन्हे' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यासाठी व्याख्याते म्हणून श्री राम गोपाल, सहा.पोलिस निरीक्षक, नवी मुंबई यांनी मार्गदर्शन केले. सदर व्याख्यान हे सर्वांसाठी खुले होते.

**१४ मे – २० मे २०२४ : फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम**

**ऑनलाइन – ३० तास**

**समन्वयक : डॉ श्रीविद्या जयाकुमार**

महाविद्यालयातील पूर्णवेळ व तासिका तत्त्वावरील प्राध्यापक कर्मचाऱ्यांसाठी विकास कार्यक्रम दिनांक १४ मे ते २० मे दरम्यान आयोजित आणि यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आला. 'गुगल मीट' ह्या माध्यमातून सदर कार्यक्रम दुपारी ३.०० ते सायंकाळी ७.०० ह्या वेळेत ऑनलाइन घेण्यात आला. १४ वेगवेगळ्या विषयांवर ही सत्रे घेण्यात आली त्यामध्ये व्यवस्थापन तत्त्वे, परीक्षा संशोधन लेखन, स्कोपस जर्नल प्रकाशन, NAAC अपेक्षा, सर्वसमावेशक शिक्षण, व्हीडिओ बनवणे आणि यु–ट्यूब वर वीडियो टाकणे, नवीन अभ्यासक्रम, नवीन कायदे, तणाव व्यवस्थापन, पोलिस स्टेशन भेटी, गुणात्मक अध्यापन, संशोधन प्रस्ताव आणि व्हीडिओ सादरीकरण असे वेगवेगळे विषय होते.

या सत्रांसाठी संसाधन व्यक्ती पुढील प्रमाणे होत्या.

डॉ. नीतिन जोशी, व्ही.एन.ब्रिम्स

डॉ. श्रीविद्या जयकुमार, सहयोगी प्राध्यापक आणि प्रभारी प्राचार्या

डॉ. महेश बर्वे, वैद्यकीय व्यवसायी

श्री. नागेश लोहार, माजी पोलिस उपायुक्त

डॉ. शर्मिला घुगे, जितेंद्र चौहान लॉ कॉलेज

डॉ. के. के. सुनिता, व्ही.के. कृष्णा मेनन कॉलेज

डॉ. सुनीता जपे, व्ही.एन.ब्रिम्स

डॉ. अंजली हस्तक, माजी डीन, गोंडवाना विद्यापीठ आणि आरटीएम नागपूर विद्यापीठ


डॉ. पूजा नरवाडकर, प्राचार्य न्यू लॉ कॉलेज सांगली

श्रीमती दातार, माजी प्राध्यापक व सेवानिवृत्त सदस्य जिल्हा ग्राहक मंच

प्राध्यापक विकास कार्यक्रमचे उद्घाटन डॉ महेश बेडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी प्रयत्नांचे कौतुक केले आणि सर्व सहकार्याचे आश्वासन दिले. डॉ. बेडेकर यांनी पुढे निदर्शनास आणून दिले की, उच्च दर्जा टिकवण्यासाठी सतत अपडेट करणे आवश्यक आहे. महाविद्यालयातील सर्व उपक्रमांची प्रेरक शक्ती गुणवत्ता असली पाहिजे, असे डॉ. बेडेकर यांनी आवर्जून सांगितले. प्राध्यापकांनी सक्रिय सहभाग घेतला. मुंबई विद्यापीठाच्या आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे प्रमुख डॉ. ए. के. सिंग हे या समारोप समारंभासाठी प्रमुख पाहुणे होते. सक्रिय सहभाग आणि कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल प्राध्यापकांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

---

माणसाची खरी ओळख त्याच्या अंतःकरणाच्या नम्रतेने होते.



## १६ मे २०२४ रोजी शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी

दिनांक१६ मे २०२४ रोजी विधी महाविद्यालयाच्या IQAC च्या माध्यमातून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी महाविद्यालयाने एका मेडिकल कॅम्पचे आयोजन केले होते. यामध्ये भूलतज्ज्ञ डॉ. महेश बर्वे यांनी सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी केली; ज्यामध्ये विशेष करून रक्तदाब आणि वजन यांचा समावेश होता. यावेळेस त्यांनी काही सूचना व व्यायाम करण्याचा सल्ला दिला.



### ॲड. लीना आशिष गोगटे



(एम कॉम. एलएलएम पीजीडीसीआरएल, पीजीडीसीएल) वकील आणि मध्यस्थ ह्या आमच्या माजी विद्यार्थिनी आहेत. ॲड. श्रीमती लीना ह्या ठाणे येथे 'चेंबर फॉर आर्बिट्रेशन अँड मेडिएशन' या नावाने लवाद आणि मध्यस्थी केंद्र चालवतात. आम्हाला खूप अभिमान आहे की, त्यांना नुकतेच भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश विद्यमान डॉ धनंजय चंद्रचुड यांनी स्वाक्षरी केलेले PGDCRL हे प्रमाणपत्र प्रदान केले आहे. खूप कमी जण प्रथम प्रयत्नात ही परीक्षा उत्तीर्ण होतात.

### प्रा. विनोद एच वाघ



प्रा. विनोद एच वाघ यांनी १ मे ते ९ मे २०२४ या दरम्यान भोपाल, मध्य प्रदेश येथील करिअर विधी महाविद्यालय आयोजित Faculty Development Programme मध्ये सहभाग घेतला. आभासी पद्धतीने हा कार्यक्रम घेण्यात आला होता.

## २२ मे २०२४ रोजी नवीन फोजदारी कायद्यावरील कार्यशाळा संपन्न

दिनांक २२ मे २०२४ रोजी विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपरिषद विधी महाविद्यालय आणि ठाणे ग्रामीण पोलिस यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन फौजदारी कायद्यावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन ठाणे पोलिस मुख्यालय येथील वित्तक सभागृहात करण्यात आले होते. यावेळी उद्घाटन सत्रामध्ये बोलताना ठाणे पोलिस ग्रामीणच्या अतिरिक्त पोलिस अधीक्षक डॉ. दीपाली

धाटे यांनी नवीन फौजदारी कायदे समजून घ्यायची पहिली जबाबदारी पोलिसांची असल्याचे सांगितले. पोलिसांना हे कायदे समजून ते व्यवस्थित राबवायचे असल्या कारणाने सदर कार्यशाळेचे आयोजन केले असल्याचे सांगितले. भारत सरकारने सूचित केल्याप्रमाणे नवीन फौजदारी कायदे हे १ जुलै २०२४ पासून अंमलात येणार आहेत. भारतीय दंड संहिता, फोजदारी प्रक्रिया संहिता आणि भारतीय पुरावा कायदा यांच्या जागी नवीन आलेले फोजदारी कायदे लागू करत असल्यामुळे सदर कार्यशाळा घेणे महत्त्वाचे झाले आहे. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी विधी महाविद्यालयाचे विधी सहाय्य कक्ष कशा प्रकारे कायदा समजून सांगण्याचे व जागृतीचे काम करते याबद्दल माहिती दिली. या कार्यशाळेमध्ये ठाणे ग्रामीण पोलिस दलाचे अनेक अधिकारी हजर होते. तसेच अनेक अधिकारी यांनी आभासी पद्धतीने या कार्यशाळेत भाग घेतला. या कार्यशाळेमध्ये नवीन फोजदारी कायद्यावर प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये माजी जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. संजय भाटे यांनी ‘भारतीय न्याय संहिता’, प्राध्यापक विनोद एच वाघ यांनी ‘भारतीय नागरिक सुरक्षा संहिता’, तर डॉ. गोपीचंद खाडे यांनी ‘भारतीय साक्ष अधिनियम’ या नवीन कायद्या संदर्भात माहिती दिली.



**३१ मे २०२४ कायदेशीर मदत कक्ष आयोजित ‘राष्ट्रीय तंबाखू विरोधी दिन’ रॅली**

३१ मे २०२४ रोजी, विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपरिषद विधी महाविद्यालय, यांच्या कायदेशीर मदत कक्षाने व दंत विभाग सिव्हिल हॉस्पिटल ठाणे ह्यांनी एकत्रित ठाणे जिल्हा प्राधिकरण ह्यांच्या द्वारे आयोजित राष्ट्रीय तंबाखू विरोधी दिन रॅलीमध्ये सक्रिय सहभाग घेतला. तंबाखूच्या वापराच्या हानिकारक प्रभावांबद्दल जागरूकता वाढवणे आणि तंबाखूमुक्त समाजाला प्रोत्साहन देणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा न्यायाधीश श्री ईश्वर सूर्यवंशी उपस्थित राहून कार्यक्रमाची प्रतिष्ठा वाढवली.

व्हीपीएमच्या टीएमसी लॉ कॉलेजचे विद्यार्थी आणि प्राध्यापकांची रॅलीला लक्षणीय उपस्थिती होती. महाविद्यालयाने तंबाखू नियंत्रणासाठी आणि सार्वजनिक आरोग्याला प्रोत्साहन देण्यासाठी आरोग्यसेवा व्यावसायिक, नर्सिंग विद्यार्थी, पोलिस दल, स्थानिक समुदाय सदस्य इत्यादींसह इतर सहभागींसह सहभाग घेतला.

रॅलीची सुरुवात तंबाखू सेवनामुळे होणारे आरोग्य धोके आणि तंबाखू बंद करण्याचे महत्त्व सांगणाऱ्या माहितीपूर्ण भाषणांनी झाली. जिल्हा न्यायाधीश श्री ईश्वर सूर्यवंशी यांनी आपल्या अभिभाषणात तंबाखू नियंत्रणाच्या कायदेशीर बाबी आणि सार्वजनिक आरोग्याचे रक्षण करण्यासाठी तंबाखूविरोधी कायद्यांची कठोर अंमलबजावणी करण्याची गरज यावर प्रकाश टाकला.

वि.प्र.मं.च्या ठा.म.पा.विधी महाविद्यालयातील विद्यार्थी आणि कर्मचारी, हे तंबाखूविरोधी संदेशांसह बॅनर आणि पोस्टर्स प्रदर्शित करून रॅलीमध्ये सक्रियपणे सहभागी झाले. तंबाखूमुक्त जीवनशैलीचे समर्थन करणारे आणि धूम्रपानाच्या हानिकारक प्रभावांबद्दल जागरूकता

वाढवणारे उत्साही मंत्रोच्चार आणि घोषणा देत हॉस्पिटलच्या आवारात निघालेल्या मोर्चात दिसून आले.

कार्यक्रमात शपथग्रहण देखील करण्यात आले ज्यात व्यक्तींनी तंबाखू नियंत्रण उपक्रमांना पाठिंबा देण्यासाठी आणि त्यांच्या समुदायांमध्ये आरोग्यदायी निवडींना प्रोत्साहन देण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेची पुष्टी केली. संपूर्ण रॅलीमध्ये तंबाखूच्या सेवनामुळे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम, धूम्रपान सोडण्याचे फायदे, धुम्रपानमुक्त वातावरण निर्माण करण्याचे महत्त्व याविषयी मुख्य संदेश देण्यात आला. तंबाखूच्या सेवनाशी संबंधित जोखमींबद्दल लोकांना शिक्षित करण्यासाठी आणि व्यक्तींना त्यांच्या कल्याणासाठी माहितीपूर्ण निर्णय घेण्यासाठी प्रेरित करण्यासाठी या कार्यक्रमाने एक 'व्यासपीठ' म्हणून काम केले.

या कार्यक्रमाने व्हीपीएमच्या टीएमसी लॉ कॉलेज, ठाणे येथील विद्यार्थी आणि प्राध्यापकांना समुदायाशी जोडून घेण्याची, तंबाखूच्या वापराच्या धोक्यांबद्दल जागरूकता वाढवण्याची आणि तंबाखूमुक्त समाज निर्माण करण्याच्या मोठ्या ध्येयामध्ये योगदान देण्याची मौल्यवान संधी उपलब्ध करून दिली. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या सक्रिय नेतृत्वाखालील महाविद्यालय तंबाखू नियंत्रण उपक्रमांना पाठिंबा देण्यासाठी आणि निरोगी, तंबाखूमुक्त भविष्यासाठी वचनबद्ध आहे.







'आपला पर्यावरण' या मासिकाने विद्या प्रसारक मंडळ ठाणे महापालिका विधी महाविद्यालयाला पर्यावरण कायद्यावरील बारा लेखांची मालिका देण्यासाठी आमंत्रित केले आहे. मालिकेतील पहिले लेख डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी लिहिलेले आहेत आणि दि. २० मे २०२४ रोजी पाठवले आहेत.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

### विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाचे अभियांत्रिकी महाविद्यालयात रूपांतर

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाचे मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयात रूपांतर करण्यासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली कडून मान्यता मिळाली आहे. या अभियांत्रिकी महाविद्यालयात कॉम्प्युटर इंजिनिरिंग, इन्फॉर्मेशन टेकनॉलॉजि, ऑटोमेशन अँड रोबोटिक्स, इलेक्ट्रिकल इंजिनीरिंग, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन शाखांचा समावेश आहे.




नव्याने सुरू होत असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये आवश्यक त्या सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. दहा हजार चौरस मीटर क्षेत्रफळ असलेल्या ४ इमारतींचा यामध्ये समावेश आहे. या इमारतींमध्ये आवश्यक त्या वर्ग खोल्या, प्रयोगशाळा, सुसज्ज ग्रंथालय आणि इतर सुविधा उपलब्ध आहेत.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्नित विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाने दर्जेदार पदविका शिक्षणाची चाळीस वर्षे पूर्ण केली आहेत. ठाणे शहराला जाणवत असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयाची गरज लक्षात घेऊन विद्या प्रसारक मंडळाने २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या तंत्रनिकेतनाचे रूपांतर अभियांत्रिकी महाविद्यालयात करण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भात अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यता मिळाली आहे.

विद्या प्रसारक मंडळाच्या गुणवत्तापूर्ण व अद्ययावत तंत्रशिक्षण देण्याच्या प्रयत्नांमुळेच तंत्रनिकेतनाला National Board of Accreditation, नवी दिल्ली या संस्थेने सन २००४, २०१७, २०१९ आणि २०२३ (३० जून २०२६ पर्यंत वैध) मान्यता दिली आहे. संस्थेला २००९ आणि २०१५ मध्ये सर्वोत्कृष्ट तंत्रनिकेतनासाठी असलेला ISTE नरसी मोंजी पुरस्कार देखील मिळाला आहे. त्याचप्रमाणे २००९, २०१७ आणि २०२० मध्ये महाराष्ट्र-गोवा विभागातील ISTE सर्वोत्कृष्ट विद्यार्थी चॅप्टर पुरस्कार देखील मिळाला आहे. इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टीम प्रोग्रामच्या दोन प्रयोगशाळांना २०१५ आणि २०१६ साठी MSBTE सर्वोत्कृष्ट प्रयोगशाळा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. शिक्षण मंत्रालय आणि AICTE ने ५० संस्थांना मार्गदर्शन करण्यासाठी विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाची निवड केली होती. तंत्रनिकेतनाला २००५ आणि २०२२ मध्ये खेड प्रयोगशाळा आणि Power System प्रयोगशाळा स्थापन करण्यासाठी AICTE समर्थित MODROBS (मॉडर्नायझेशन आणि रिमूव्हल ऑफ ऑब्सोलसेन्स) अनुदान मिळाले आहे.

१९३५ साली स्थापन झालेल्या विद्या प्रसारक मंडळाच्या विविध शाखांमधून दरवर्षी अठरा हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दर्जेदार अभियांत्रिकी शिक्षण देण्यासाठी विद्या प्रसारक मंडळ नेहमीच कटिबद्ध राहील अशी हमी विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी दिली.

इच्छुक विद्यार्थी आणि पालकांनी प्रवेश प्रक्रियेसाठी संस्थेला भेट द्यावी, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

**'Living with Climate Change & Water Management' या विषयावर Online Course-**

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाने विद्यार्थ्यांमध्ये बदलत्या हवामान व पर्यावरण विषयी जागृती आणण्यासाठी व पर्यावरण संवर्धनासाठी अंमलात आणल्या जाणाऱ्या उपाय योजनेसाठी 'युनिसेफ', 'महाराष्ट्र शासन', 'सेंटर फॉर एन्वारमेन्ट एज्युकेशन', 'लाईफस्टाईल फॉर एन्व्हारमेन्ट', 'माझी वसुंधरा ४.०' व ACWADAM यांच्या संयुक्त विद्यमाने उपलब्ध केलेल्या 'Living with Climate Change & Water Management' या विषयावर तयार केलेल्या Online Course ला तंत्रनिकेतनातील १९३ विद्यार्थ्यांनी, तसेच शिक्षकांनी भरघोस प्रतिसाद देऊन Course चांगल्या गुणांनी यशस्वी-रित्या पूर्ण करून प्रशस्तीपत्रक संपादन केले.




ठाणे महानगरपालिकेने वरील कार्याचा सन्मान ५ जून या जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून उपआयुक्तांच्या हस्ते करण्यात आला. सदर कार्यक्रम ठाणे महानगरपालिका व श्रीकला संस्कार न्यास यांच्या

संयुक्त विद्यमाने सायंकाळी ५ वाजता काशिनाथ घाणेकर नाट्यगृह (ठाणे) येथे आयोजित केला व सन्मानचिन्ह स्वीकारण्यासाठी डॉ. डी. के. नायक (प्राचार्य), डॉ. सौ. गीताली इंगवले (Green Club Co-ordinator), सौ. वैशाली जोशी (HOD, Instrumentation) व विद्यार्थी उपस्थित होते.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

६ मे : प्राध्यापिका डॉ. स्मिता जपे यांचे 'बेसिक ऑफ फायनान्शियल अकाउंटिंग' या विषयावरील पुस्तक प्रकाशित झाले.







१० मे : डॉ. विभूती सावे यांनी ६-१० मे २०२४ रोजी आयोजित 'नॅशनल केस रायटिंग अँड टीचिंग विथ केसेस' या चार दिवसीय कार्यशाळेत यशस्वी सहभाग घेतला.




१३ - १७ मे : डॉ स्मिता जपे यांनी ठाकूर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजच्या प्राध्यापकांसाठी 'बिब्लियोमेट्रिक विश्लेषण वापरून अ श्रेणी शोधनिबंध लेखन' या विषयावर संशोधन - प्राध्यापक विकास सत्र घेतले.

१४ मे : वि.प्र.म. च्या विधी महाविद्यालयातर्फे आयोजित केलेल्या प्राध्यापक विकास कार्यक्रम मध्ये व्यवस्थापन तत्त्वाबाबत प्राध्यापकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने, व्यवस्थापनाच्या तत्त्वांवर मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. नीतिन जोशी यांना तज्ज्ञ वक्ता म्हणून आमंत्रित करण्यात आले.

१५ मे : डॉ. स्मिता जपे यांनी यु एस च्या 'येल युनिव्हर्सिटी चा फायनान्शियल ग्लोबल मार्केट' या विषयावरील २ महिन्यांचा ऑनलाइन अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करून प्रमाणपत्र मिळविले.




१७ मे : डॉ. स्मिता जपे यांना टीएमसी विधी महाविद्यालयाच्या प्राध्यापकांसाठी स्कोपस इंडेक्स्ड जर्नलमध्ये शोधनिबंध / लेखन प्रकाशनासंदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले.

२३ मे : डॉ. व्ही एन ब्रिम्स आणि नॅशनल स्टॉक एक्सचेन्ज ऑफ इंडिया (एन.एस.ई.) मध्ये सामंजस्य करार करण्यात आला. या करारनाम्यावर डॉ. विजय बेडेकर (अध्यक्ष–व्ही.पी.एम., ठाणे), डॉ. महेश बेडेकर, डॉ. नीतिन जोशी (संचालक – डॉ. व्हीएन ब्रिम्स), डॉ. गुरुप्रसाद मूर्ती (महासंचालक – डॉ. व्ही.एन. ब्रिम्स) आणि अन्य व्ही.पी.एम. पदाधिकारी, तसेच श्री. रंगनाथन (सहायक उपाध्यक्ष, एन.एस.ई. अकादमी लिमिटेड) यांच्या उपस्थितीत स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या करारामुळे ब्रिम्सच्या विद्यार्थ्यांना एन.एस.ई. च्या ट्रेडिंग प्लॅटफॉर्मवर आभासी चलनाचा वापर करून व्यावहारिक अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे. एन.एस.ई. स्मार्ट प्लॅटफॉर्म हा अत्याधुनिक सिम्युलेशनवर आधारित अभ्यास संच आहे. याद्वारे विद्यार्थ्यांना शेअर बाजारातील गतिशीलतेची ओळख करून दिली जाते. यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यापार जोखीम व्यवस्थापन आणि गुंतवणूक निर्णय घेण्याच्या कौशल्याचा विकास होईल.

एन.एस.ई. स्मार्ट प्लॅटफॉर्म देशभरातील प्रमुख शैक्षणिक संस्थांनी स्वीकारला असून, त्यामुळे विद्यार्थ्यांना शेअर बाजाराची समग्र समज विकसित करण्यासाठी आणि आर्थिक क्षेत्रातील यशासाठी आवश्यक कौशल्ये संपादन करण्यात मदत होते.



२५ मे : डॉ. विभूती सावे यांनी २० – २५ मे २०२४ दरम्यान, यु जी सी प्रायोजित व मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती द्वारे आयोजित कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावरील अल्प–मुदतीचा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केला.

२८ मे : डॉ. स्मिता जपे यांना, बॉम्बे मॅनेजमेंट असोसिएशनच्या सहकार्याने आणि मराठा मंदिरच्या बाबासाहेब गावडे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजतर्फे आयोजित कार्यशाळेमध्ये संशोधन पद्धतीवरील सत्र घेण्यासाठी आमंत्रित करण्यात आले.

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.